



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २४२ * नांदेड * गुरूवार, दि. १० सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# सण-उत्सवाच्या काळात मनोज जरांगेंनी आंदोलन स्थगित करुन सहकार्य करावं

## मंत्री उदय सामंत आणि आ. प्रसाद लाड यांची विनंती

**मुंबई (प्रतिनिधी)–** आगामी सण-उत्सवाच्या काळात मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन स्थगित करून सहकार्य करावं, अशी विनंती मंत्री उदय सामंत आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांनी पत्रकार परिषदेतून केली.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला १२ दिवस झाले असून सरकारने त्यांच्या १२ मागण्या मान्य केल्याचं मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितलं होतं. मात्र, सरकारने एकही मागणी मान्य केली नसल्याचं सांगत जरांगे पाटलांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. त्याच पार्श्वभूमीवर आता सरकरच्यावतीने मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची बाजू मांडली. तसेच, जरांगे पाटलांच्या भाषेवरुन, जसे त्यांचे समर्थक तसे आमच्या नेत्यांचेही समर्थक असल्यां सामंत यांनी म्हटले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने मी आणि प्रसाद लाड, आम्ही छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रशासन, तथा आरक्षण समितीची बैठक घेतली. आत्तापर्यंत मराठा समाजासाठी जे काही काम केले त्यासाठी या बैठक होत्या. मराठवाड्यात २१ हजार ५१ जात प्रमाणपत्र दाखले पडताळणी केली असून त्यातील १६,११० दाखले दिले आहेत. त्यामुळे, पडताळणी चुकीची होतेय हा गैरसमज आहे, असे उदय सामंत यांनी म्हटले. तसेच, फक्त २ हजार दाखले प्रलंबित आहेत, तेही लवकरच मिळतील. त्याचा ओबीसी समाजावर काहीही परिणाम होणार नाही, सरकारची भूमिका स्पष्ट आहे, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

आम्ही कुणालाही दुजाभाव वागणूक दिली नाही, सरकार म्हणून आम्ही सोबत आहोत, अधिकारी काम करत आहेत. मनोज दादा खुश रहावे तसे एकनाथ शिंदेही आनंदी रहावे, फडणवीस साहेब ही आनंदी रहावे, मनोज दादाचे अनेक फॉलोअर्स आहेत. त्यामुळे, ज्या नेत्यांनी काम केले त्या नेत्यांबद्दल वाईट बोलले तर वाईट वाटते, असे म्हणत उदय सामंत यांनी जरांगे पाटलांकडून एकनाथ शिंदेंचा एकेरी उल्लेख करण्यात आल्यावरुन मत मांडले. तसेच, जाणीवपूर्वक कुणीतरी त्यांच्यात गैरसमज करतंय, असे उदय सामंत यांनी म्हटले.

### सरकारला गुडघ्यावर आणण्यासाठी लढावे -जरांगे

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राद्वारेच ओबीसी प्रवर्गातून आरक्षण हवे आहे. मात्र, राज्य सरकारचा मराठ्यांचे वाटोळे करण्याचा त्यांचा कट आहे. तुम्ही काहीही करा, आम्हाला मारून टाका, पण आम्ही आरक्षणाच्या मागणीपासून आता एक पाऊलही मागे हटणार नाही. आत्महत्यांनी या निर्दयी सरकारला काहीही फरक पडत नाही, उलट हा सरकारने घेतलेला बळी आहे. त्यामुळे समाजाने हतबल न होता एकत्र येत सरकारला गुडघ्यावर आणण्यासाठी लढावे, पण कोणीही टोकाचे पाऊल उचलू नका, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी समाजाला केले आहे.

# राज्यात पावसाची १६ टक्के तूट

## ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान विदर्भ-मराठवाड्यात पावसाची शक्यता



**मुंबई (प्रतिनिधी)–** यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यात आता राज्यात पावसाची तब्बल १६ टक्के तूट झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याचे चित्र आहे. या भागांमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात तर जवळपास ७० टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे.

दरम्यान, ११ सप्टेंबर ते १४ सप्टेंबरदरम्यान पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात काही भागांमध्ये पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी विशिष्ट प्रकारचे आणि योग्य स्थितीतील ढग असणे आवश्यक असते. मात्र, कृत्रिम पावसाचा प्रयोग केला तरी त्यातून नेमका किती पाऊस पडेल, हे निश्चितपणे सांगता येत नाही. आतापर्यंतची पावसाची परिस्थिती पाहता शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. उभी पिके करपली असून अनेक ठिकाणी फळझाडांनाही मोठा फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा काटकसरीने आणि जपून वापर करणे गरजेचे आहे.

मराठवाड्यात मागील ४५ दिवसांपासून पावसाचा थेंबही न पडल्याने दुष्काळाची छाया अधिक गडद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात तर परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, हजारो रुपये खर्च करून दिवस-रात्र मेहनत करून उभं केलेलं सोयाबीन पीक आता शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर मातीमोल होत आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील बेरुळा येथील शेतकरी अमृता चव्हाण यांनी तब्बल सात एकर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र पावसाअभावी पीक करपून गेलं. उत्पादनाची कोणतीही शक्यता उरली नाही आणि अखेर नाईलाजाने अमृता चव्हाण यांनी उभ्या सोयाबीन पिकावर रोटावेटर फिरवत पीक नष्ट केलं. ज्या पिकातून चार पैसे हातात पडतील कुटुंबाचा संसार चालेल, अशी आशा होती. त्याच पिकावर आता रोटावेटर फिरवण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. हिंगोली जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची अशीच अवस्था झाली असून, पावसाअभावी उभी पिकं करपली आहेत. शेतकऱ्यांसमोर आता उत्पादनाचा प्रश्न तर आहेच, पण केलेला खर्चही वसूल होणार का, हा मोठा सवाल उभा राहिला आहे.

# मुख्य परीक्षेतील गुणांच्या तक्रारींनंतर एमपीएससीकडून गुणपडताळणीची संधी

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या उमेदवारांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्य परीक्षेच्या गुणांमधील प्रचंड तफावतीबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर, आयोगाने उमेदवारांना गुणांच्या फेरपडताळणीची संधी उपलब्ध करून दिली आहे.

इच्छुक उमेदवारांना आयोगाने निश्चित केलेल्या ऑनलाईन प्रक्रियेद्वारे १० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. गुणपडताळणीनंतरची अंतिम परिस्थिती उमेदवारांच्या प्रोफाइलमध्ये थेट कळवली जाईल, असं महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पष्ट केलं आहे.

एमपीएससीने २५ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या लेखी परीक्षेचा निकाल जाहीर केला होता. या निकालानंतर मुलाखतीसाठी अपात्र ठरलेल्या अनेक उमेदवारांच्या गुणांमध्ये अत्यंत धक्कादायक तफावत दिसून आली.

# जरांगेंकडे शिष्टमंडळ जाणार नाही, विखे-पाटलांच्या वक्तव्याने मराठा समाज संतापला; हदगावमध्ये बॅनर्स पाडले

**नांदेड (प्रतिनिधी)–** सरकारचे शिष्टमंडळ आता मनोज जरांगे पाटील यांच्याकडे जाणार नाही, असे वक्तव्य करून मराठा समाजाच्या जखमेवर मीठ चोळल्याचा आरोप केला आहे. यावरून संतप्त मराठा आंदोलकांनी बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी दुपारी हदगाव शहरात मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांचे बॅनर फाडून निषेध व्यक्त केला.



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे गेल्या १२ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. अशातच मंत्री विखे-पाटील यांनी आम्ही सर्व निर्णय घेतले आहेत, सरकारचे शिष्टमंडळ आता जरांगेंकडे जाणार नाही, असे वक्तव्य केल्याने मराठा समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या वक्तव्याच्या निषेधार्थ बुधवारी हदगाव रोडवर लावण्यात आलेले मंत्री विखे-पाटील यांचे बॅनर मराठा आंदोलकांनी खाली उतरवून फाडून टाकले. यावेळी मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, विखे-पाटील मुर्दाबाद अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

# राज्यात 'हिंदू वाणीं'च्या ३ जातींना ओबीसी प्रमाणपत्र मिळणार, सरकारचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)–** 'हिंदू वैश्य, हिंदू वाणी आणि हिंदू वैश्य वाणी या तीनही जाती एकच आहेत', असा निर्वाळा देत राज्याचे ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. या निर्णयामुळे वैश्यवाणी जातीच्या नागरिकांना ओबीसी प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालाचा दाखला देत मंत्री अतुल सावे यांनी या तिन्ही जातींचा एकच सामाजिक घटक असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी वैश्यवाणी जातीच्या प्रमाणपत्रांच्या प्रकरणांमध्ये आयोगाच्या अहवालाचा विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वैश्यवाणी समाजातील नागरिकांना ओबीसी प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळताना अनेकदा अडचणी येत असल्याची बाब समोर आली होती.

# बरडशेवाळा हायवेवर मराठा समाजाचा रास्ता रोको; जरांगेंच्या उपोषणाला पाठिंबा, वाहनांच्या रांगा





**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील गेल्या १२ दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण करत आहेत. या उपोषणाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी बरडशेवाळा बायपासवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

नागपूर- नांदेड- तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील हदगाव- वारंगा रोडवरील बरडशेवाळा बायपासवर सकाळी दोन ठिकाणी हे आंदोलन झाले. यावेळी महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

हदगाव, हिमायतनगरसह बाहेरील तालुक्यातील मोठ्या संख्येने मराठा बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे अडीच तास चाललेल्या या आंदोलनात रुग्णवाहिकेला अडथळा होणार नाही याची काळजी आंदोलकांनी घेतली.

आंदोलन शांततेत पार पडावे, यासाठी नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने मनाठा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास चवळी, पोउपनि सुदर्शन इंगोले व पोलीस कर्मचारी घटनास्थळी तैनात होते.

# दहीहंडी उत्सवात अश्लील नृत्याप्रकरणी ८ नृत्यांगनांवर गुन्हा

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यात दहीहंडी उत्सवादरम्यान अश्लील गाण्यांवर नृत्य करणाऱ्या नृत्यांगनांवर आणि आयोजकांवर सहकारनगर पोलिसांनी कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. प्रसिद्ध नृत्यांगना राधा पाटील हिच्यावर आधीच गुन्हा दाखल झाल्यानंतर, आता आणखी आठ नृत्यांगनांविरोधात सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या नव्या कारवाईत महाराष्ट्रातील प्रसिद्ध नृत्यांगना निशा मुंबईकर आणि शुभांगी थोरात यांच्यासह आठ जणींचा समावेश आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी केवळ कलाकारांवरच नाही, तर कार्यक्रमाचे आयोजक आणि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल केले आहेत.


दहीहंडी उत्सवाचा उत्साह, गोविंदांची मोठी गर्दी आणि त्यात रंगलेला लावणी आणि नृत्याचा कार्यक्रम. मात्र, याच कार्यक्रमात अत्यंत अश्लील आणि द्विअर्थी गाणी वाजवून त्यावर अश्लील नृत्य केल्याचा गंभीर आरोप संबंधित नृत्यांगनांवर करण्यात आला आहे.

याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी कसून तपास सुरू केला असून, कार्यक्रमादरम्यान पोलिसांच्या नियमांचे आणि परवानग्यांचे उल्लंघन झाले आहे का, याचीही सखोल चौकशी केली जात आहे. पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील कला, लोककला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांशी संबंधित 'रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळा'च्या नियमांनुसार कोणत्याही जाहीर नृत्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

# सत्य निकेतन इमारत दुर्घटनेत आतापर्यंत सात जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्लीत सत्य निकेतन परिसरात रविवारी दुपारी एका खासगी वसतिगृहाची पाच मजली इमारत कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले. घटनेचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. या प्रकरणात आता आणखी एकाला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणातली ही पाचवी अटक आहे.

पोलिसांनी सांगितलं की, आम्ही सुधांशू नावाच्या माणसाला अटक केली आहे. सत्य निकेतन या ठिकाणी पेईंग गेस्ट ऑपरेटर म्हणून हा काम करत होता. त्याला आम्ही आज अटक केली आहे. सत्य निकेतन ही इमारत कोसळून रविवारी सात जणांचा मृत्यू झाला.



# बांगलादेशमध्ये युद्धसरावात थरार!

## टँकमधून फायरिंग करताच अचानक स्फोट; २ जवानांचा मृत्यू

**ढाका (वृत्तसंस्था)–** बांगलादेशमध्ये सैन्याच्या फील्ड फायरिंग सरावादरम्यान भीषण दुर्घटना घडली आहे. चटगावमधील हाटहजारी फील्ड फायरिंग रेंजमध्ये टँकमधून गोळीबार सुरू असताना अचानक अपघात झाला. या दुर्घटनेत बांगलादेश लष्करातील दोन जवानांचा मृत्यू झाला असून एक अधिकारी गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हाटहजारी फील्ड फायरिंग रेंजमध्ये लष्करी सराव सुरू होता. यावेळी एका टँकमधून गोळीबार केला जात असताना अचानक दुर्घटना घडली.

# स्नेहबंध! माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड पोहोचले वझरा गावात!

**श्रीक्षेत्र माहूर (प्रतिनिधी)–** मोठमोठी पदे, मान-सन्मान आणि राजकीय प्रतिष्ठा यापलीकडेही काही नाती मनाला जोडलेली असतात. अशाच एका जिव्हाळ्याच्या नात्याची प्रचिती किनवट तालुक्यातील आदिवासीबहुल वझरा (बु.) या छोट्याशा गावाने मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी अनुभवली. देशाचे माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी एका कर्मचाऱ्यांसोबत निर्माण झालेल्या कौटुंबिक संबंधांची जपणूक करत, सहपत्नीक वझरा येथे येऊन येईलवाड कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.



दिवंगत वनपरिक्षेत्र अधिकारी जगन्नाथ बळीराम येईलवाड यांच्या निधनाचे दुःख मनात घेऊन धनखड यांनी थेट त्यांच्या घरी जाऊन कुटुंबियांची भेट दिली. ३० जुलै रोजी जगन्नाथ येईलवाड यांचे निधन झाले होते. त्यांचे पुत्र तथा पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगचे पोलीस अधीक्षक (आयपीएस) श्रीकांत येईलवाड यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत धनखड यांनी तब्बल दोन तास कुटुंबियांशी संवाद साधला.

ही भेट एका आप्ताच्या दुःखात दुसरा आप्त पाठीशी उभा राहावा, अशी माणुसकीची भेट होती. पदाचा प्रोटोकॉल बाजूला ठेवून धनखड यांनी येईलवाड कुटुंबीयांना दिलेला वेळ आणि आधार उपस्थितांसाठी भावनिक क्षण ठरला. त्यांनी दिवंगत जगन्नाथ येईलवाड यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी त्यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड यांचीही उपस्थिती होती.

या भेटीनंतर आयपीएस अधिकारी श्रीकांत येईलवाड भावुक झाले. मी आज जे काही आहे, ते केवळ माझ्या वडिलांच्या संस्कारांमुळेच आहे, त्यांचा आशीर्वाद नेहमीच माझ्या पाठीशी राहील, या शब्दांत त्यांनी वडिलांच्या आठवणींना उजाळा दिला. एका बाजूला वडिलांच्या आठवणींनी भरून आलेले डोळे आणि दुसऱ्या बाजूला दुःखाच्या क्षणी आधार देण्यासाठी स्वतः उपराष्ट्रपतींची उपस्थिती, या प्रसंगाने वझऱ्याच्या मातीतील माणुसकीचे दर्शन घडवले.

किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम यांनीही येईलवाड कुटुंबियांची भेट घेऊन दिवंगत जगन्नाथ येईलवाड यांना श्रद्धांजली अर्पण केली. उपराष्ट्रपतींच्या आगमनामुळे वझरा गावात सकाळपासूनच प्रशासकीय हालचालींना वेग आला होता. कडेकोट पोलीस बंदोबस्त, आरोग्य विभाग, महसूल प्रशासन आणि अग्निशमन दल यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


मात्र, या सर्व प्रोटोकॉलच्या पलीकडे धनखड यांच्या भेटीने वझरा गावाला एक वेगळीच ओळख मिळवून दिली. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदांपैकी एक पद भूषवणाऱ्या व्यक्तीने एका छोट्याशा आदिवासी गावातील कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी दिलेली ही भेट पदापेक्षा नात्यांना आणि माणुसकीला श्रेष्ठ मानणारा संदेश देऊन गेली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# जुन्या इमारतीं की 'मृत्यूचा सापळा'?

दिल्लीतील सत्य निकेतन परिसरात ५० वर्षे जुनी पाच मजली इमारत कोसळून पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना केवळ एक दुर्घटना म्हणून विसरता येणार नाही. ढिगाऱ्याखालून मदतीसाठी येणाऱ्या 'वाचवा-वाचवा'च्या आर्त हाका व्यवस्थेच्या निष्काळजीपणावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. एखादी इमारत अचानक कोसळते तेव्हा केवळ सिमेंट, लोखंड आणि विटांचा ढिगारा होत नाही; त्याखाली अनेक कुटुंबांची स्वप्ने, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि निष्पाप जीव गाडले जातात. त्यामुळे अशा दुर्घटनांनंतर केवळ मदत, पंचनामा आणि चौकशी जाहीर करण्यापेक्षा दुर्घटना होण्याआधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हीच खरी प्रशासनाची जबाबदारी आहे. सत्य निकेतनमधील इमारत जुनी होती. ती काही काळ रिकामीही होती. नंतर पुन्हा पीजी सुरू झाले आणि नुतनीकरणाचे काम सुरू असतानाच इमारत कोसळली. तळघरासाठी खोदकाम किंवा बांधकामामुळे पायाभूत रचना कमकुवत झाली का, हा तपासाचा विषय आहे. परंतु या घटनेतून एक मूलभूत प्रश्न समोर येतो की, ज्या इमारतीत ७५ विद्यार्थ्यांना राहण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जाते, तिची संरचनात्मक सुरक्षितता तपासली होती का? देशातील मोठ्या शहरांमध्ये हजारो जुन्या इमारती आजही वापरात आहेत. मुंबई, दिल्ली, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, हैदराबाद, बंगळुरू, कोलकाता, चेन्नई यांसारख्या शहरांमध्ये जुन्या निवासी इमारती, वसतिगृहे, पीजी, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा आणि व्यावसायिक संकुले मोठ्या संख्येने आहेत. यापैकी किती इमारतींचे अलीकडे संरचनात्मक ऑडिट झाले आहे, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या शहरात जुन्या इमारतींचे संरचनात्मक ऑडिट अनिवार्य केले पाहिजे. केवळ कागदावर प्रमाणपत्र देण्याची पद्धत नको; स्वतंत्र आणि अधिकृत अभियंत्यांकडून प्रत्यक्ष तपासणी झाली पाहिजे. इमारतीची पायाभरणी, बीम, कॉलम, स्लॅब, भारवाहक भिंती, गंजलेले लोखंड, पाण्याची गळती, अनधिकृत बांधकाम, बेसमेंटचे खोदकाम आणि केलेले बदल यांची सखोल तपासणी झाली पाहिजे. विशेषतः जुन्या इमारतीत बेसमेंट, अतिरिक्त मजला, मोठ्या प्रमाणावर तोडफोड किंवा नुतनीकरण सुरू करण्यापूर्वी संरचनात्मक सुरक्षिततेचे प्रमाणपत्र बंधनकारक केले पाहिजे. मूळ आराखड्यातील बदल करून इमारतीवर अतिरिक्त भार टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ऑडिटनंतर इमारतींचे स्पष्ट वर्गीकरण झाले पाहिजे. सुरक्षित इमारतींना वापराची परवानगी, दुरुस्ती आवश्यक असलेल्या इमारतींना निश्चित मुदत आणि धोकादायक इमारतींना तातडीने रिकामे करण्याचे आदेश, अशी पारदर्शक व्यवस्था असली पाहिजे. रहिवाशांना इमारतीची सुरक्षा स्थिती कळली पाहिजे. 'धोकादायक' इमारतीत लोकांना राहू देऊन दुर्घटनेची वाट पाहणे हा प्रशासनाचा अपराध ठरला पाहिजे. या व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका निर्णायक आहे. बांधकाम परवानगी देणे आणि कर वसूल करणे एवढ्यापुरती महापालिकेची जबाबदारी मर्यादित राहू नये. शहरातील जुन्या इमारतींचा डिजिटल डेटाबेस तयार करून प्रत्येक इमारतीचे वय, मालकी, वापर, संरचनात्मक स्थिती आणि शेवटच्या ऑडिटची तारीख नोंदवली पाहिजे. ऑडिटमध्ये त्रुटी आढळल्यास त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही झाली की नाही, याचेही परीक्षण झाले पाहिजे. अरुंद रस्ते आणि गल्ल्यांमुळे बचावकार्याला आलेले अडथळे हीदेखील या दुर्घटनेतील गंभीर बाब आहे. शहरांची वाढ नियोजनाशिवाय होत राहिली आणि आपत्कालीन यंत्रणेला प्रवेशच मिळत नसेल तर दुर्घटनेतील मृत्यू वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे जुन्या आणि दाट वस्त्यांमध्ये फायर टेंडर, रुग्णवाहिका आणि बचाव पथकांसाठी आपत्कालीन प्रवेशमार्ग निश्चित करणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक दुर्घटनेनंतर 'चौकशी समिती' नेमण्याची परंपरा बदलली पाहिजे. चौकशी अहवाल येईपर्यंत आणखी एखादी इमारत कोसळली तर त्या अहवालाचा उपयोग काय? सरकारने मृत्यूची संख्या मोजण्यापेक्षा धोकादायक इमारतींची संख्या मोजली पाहिजे. देशातील प्रत्येक शहरातील जुन्या, कमकुवत आणि दुर्लक्षित इमारतींकडे लक्ष वेधणाऱ्या हाका आहेत. आज ऑडिट केले, दुरुस्ती केली आणि धोकादायक इमारत रिकामी केली, तर उद्याचा जीव वाचू शकतो. इमारत कोसळल्यानंतर मदत करण्यापेक्षा ती कोसळू नये यासाठी केलेली खबरदारी कितीतरी मोठी मानवसेवा आहे. सरकारने आता निर्णय घ्यावा की, देशातील प्रत्येक मोठ्या शहरातील जुन्या इमारतींचे अनिवार्य संरचनात्मक ऑडिट करा; धोकादायक इमारती तातडीने रिकाम्या करा; दोषींवर कारवाई करा आणि निष्पाप नागरिकांचे जीव वाचवा. कारण ढिगाऱ्याखालून येणाऱ्या आर्त हाका ऐकण्यासाठी दुर्घटना घडण्याची वाट पाहणे, ही कोणत्याही सुशासनाची ओळख असू शकत नाही.

# 'बैलपोळा' : बैलाच्या खांद्यावरचं गाव, आता होतंय ट्रॅक्टरवरचं शहर




श्रावणाचा शेवटचा पाऊस जेव्हा शेताच्या बांधावर रेंगाळत असतो... तेव्हा भाताची पिकं हिरवीगार होऊन वाऱ्यावर डोलत असतात... तेव्हा महाराष्ट्राच्या मातीला एक वेगळीच चाहूल लागते... ती चाहूल असते बैल पोळ्याची... पण तो पोळा आता बदललाय... तो बैलाच्या खांद्यावरचा राहिला नाही... तर तो आता ट्रॅक्टरवरचा झालाय...!

आमच्या लहानपणी पोळा म्हणजे शेतकऱ्याची दिवाळीच असायची... तो फक्त सण नव्हता... तर ती कृतज्ञता होती... वर्षभर ज्यानं आपल्या खांद्यावर नांगराचं ओझं वाहिलं... उन्हातान्हात आपल्यासाठी घाम गाळला... त्या मुक्या जीवाला देव मानण्याचा तो एक दिवस... आणि आमच्या घरात तर या दिवसाचे दोन देव होते... पैकी सुकऱ्या आणि दुसरा सुरत्या...!

सुकऱ्या रंगानं फिकट चॉकलेटी...मधून मधून अंधुकसा काळारंग...मारका...आणि सुरत्या म्हणजे पांढरा शुभ्र... अन् गुबगुबीत... गरीब... शांत ...वेगवेगळ्या स्वभावाचे हे दोघे नुसती बैलजोडी नव्हती... ती आमच्या घराची शान होती... सुकऱ्या काळासावळा... पण कामाला वाघ... एकानं मान टाकली की दुसरा आपोआप समजून घ्यायचा... इतकी घट्ट जोडी... की गावातले लोक म्हणायचे... 'ही बैलजोडी नाही... दोन सख्खे भाऊच आहेत...!'

पोळ्याच्या दोन दिवस आधी-पासूनच त्यांचा थाट सुरू व्हायचा... बाबा आणि दादा सकाळीच दोघांना घेऊन ओढ्यावर जायचे...तिथं तासन् तास त्यांना धुवायचे... त्यांच्या पाठीवरचं शेवाळं... खांद्यावरचं घट्टं...सगळं घासून पुसून काढायचे...आम्ही पोरं काठावर बसून बघायचो...सुकऱ्या पाण्यात लोळायचा...आणि सुरत्या सारखा बाबा अन् दादांच्याच्या अंगावर पाणी उडवायचा...!

घरी आणल्यावर मग सजावट... थोरला दादा उदगीरच्या बाजारातून खास बेगड आणायचा... धाकला दादा - अन् बाबा शिंगांना रंगवायचे... सुकऱ्याच्या शिंगाला लाल आणि सुरत्याच्या शिंगाला शेंदरी... कपाळावर मोठं कुंकवाचं बोट... गळ्यात चांदीच्या घुंगराच्या माळा... आणि पाठीवर रंगीबेरंगी झूल... ज्या झुलीवर मायने स्वतःच्या हाताने गोंडे शिवलेले असायचे... असा सजलेले सुकऱ्या -सुरत्या अंगणात उभे राहिले ...की बैल नाही... धीरोदात्त राजेच वाटायचे...!

त्या दिवशी एक नियम पक्का असायचा... आजही आहे... की त्यांना कधीच औताला... वा कामाला जुंपायचं नाही... त्यांना मोकळं सोडायचं... घरात चुलीवर पुरणपोळीचा घमघमाट सुटायचा... आणि दुपारची म्हणजे दिवस कलल्यावर निघणारी मिरवणूक... गावातले सगळे बैल एका रांगेत... पुढे धोंडिबा धोरात...त्यांचा मुलगा मालू थोरात... नातू मोहन तथा मंचूक....साधू सूर्यवंशी यांचा जावई लक्ष्मण सूर्यवंशी...अन् शिंग फुंकणारे खंडू कांबळे ...दोन वेगवेगळ्या सनई होत्या...दोन दोन हालकी... देखणा... एक शिंग... असा देखणा आणि श्रवणीय सूर असायचा... की बघत आणि ऐकतच राहावं... सुकऱ्या आणि सुरत्या... दोघांच्या गळ्यातल्या घुंगरांचा एकच ताल... टुन... टुन... टुन... तो आवाज अख्ख्या गावात घुमायचा... प्रत्येक दारात बाई ताट घेऊन उभी... घरी येणाऱ्या बैलांना ओवाळायची...!

एकदा मिरवणुकीतून परत येताना अचानक पाऊस सुरू झाला... सगळे बैल पळू लागले... पण आमचे सुकऱ्या आणि सुरत्या... जागेवरून हलले नाहीत... दोघांनी माना एकमेकांना टेकवल्या होत्या... पावसात भिजत एकमेकांना आधार देत उभे होते... ते दृश्य बघून बाबा... दोन्ही दादा म्हणाले होते... 'माणसात जी एकी नाही... ती या मुक्या जीवात आहे'... आणि संध्याकाळी सगळेचजण आपापल्या हाताने त्यांना पुरणपोळी भरवायचो... सुकऱ्या हळूच खायचा... आणि सुरत्या घाईघाईत... पण, खाली थोडीही पुरणपोळी पडू द्यायचा नाही... असं होतं तेव्हा बैलाच्या खांद्यावरचं गाव...! ...आणि आजचं गाव बघा... ट्रॅक्टरवरचं शहर झालंय... आता कोणत्याही सोसायटीत सुकऱ्या सुरत्या दिसत नाहीत... गावही जवळ जवळ तशीच झाली आहेत... ट्रॅक्टरने त्यांची जागा घेतली... मग 'पोळा' उरला कुठे?... तो फक्त मोबाईलच्या स्क्रीनवर उरलाय... सकाळी उठून व्हॉट्सॲपवर 'बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा'चा फोटो फॉरवर्ड केला... की बैल पोळ्याचा सण झाला...! जिथे बैल आहेत तिथेही पोळ्याचा आत्मा हरवलाय... पूर्वी शिंगाला हिंगूळ होता... आता प्लास्टिकचा चमकणारा कागद... पूर्वी गळ्यात घुंगरू होते... आता एलईडी लाईटचे पट्टे...पूर्वी हालकीचा संच होता... शिंगाड्याच्या शिंगाचा आवाज आकाश कवेत घेत होता... आता कान फाडणारा डी. जे.... त्या डी.जे.च्या आवाजाने तो बिचारा बैल घाबरून पळतो... आणि आपण त्याला 'नाचतोय' म्हणतो... पूर्वी पोळा हा बैलाला आराम देण्याचा दिवस होता... आज त्याच दिवशी त्याला पळवून बैलगाडा शर्यत लावतात...ज्या जीवाला देव म्हणायचं... त्याचाच बाजार मांडला जातोय...! पूर्वीचा पोळा हा 'नात्याचा' होता... आताचा पोळा हा 'देखाव्याचा' झालाय... पूर्वी आम्हा पोरांनाही बैलाची भाषा कळायची... आता पोरांना बैल म्हणजे फक्त पुस्तकातला प्राणी वाटतो...!

आता ट्रॅक्टरचं युग आलंय... गावात सुकऱ्या, सुरत्या राहिले नाहीत... पण, आजही पोळ्याच्या दिवशी जुन्या बाया पुरणपोळी करतात तेव्हा पहिली पोळी बाजूला काढून ठेवतात... म्हणतात... 'हा बैलाचा घास.... मग दुसऱ्या बैलाचा घास'... बाजूला काढून ठेवला जातो.... आता आमच्या इथले पण... बैल गेले... एकही बैल नाही... पण, त्यांची जागा आजही मनामनात तशीच... ताजी टवटवीत आहे...! ... जोपर्यंत ताटातली ती पहिली पोळी निघत राहील... तोपर्यंत बैलाच्या खांद्यावरचं गाव मरणार नाही... नाहीतर मग सगळं गावच ट्रॅक्टरवरचं शहर होऊन जाईल... जिथे शेत असेल... पण शेतकरी नसेल... आणि सण असेल... पण सुकऱ्या सुरत्या सारखी बैल जोडी नसतील...!

**-प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**
अहमदपूर, जि. लातूर

# आठवणीतला बैलपोळा!



लहान असतांना गावाकडं पोळ्याची लय मज्जा! पंचमीची लाही, अन पोळ्यानं केली घाई या झोक्यावरच्या गाण्यानं सुरु व्हायचा पोळा! पोळा आला हे लगेच कळायचं, कारण बुजुर्ग लोकांच्या एका हातात काळ्या-पांढऱ्या-रंगीबेरिंगी सुताचे बंडलं अन दुसऱ्या हातात सुत कातायचं भिरभिरं. पाऊस पडल्यामुळं वावरात वळाण्या नसायच्या. शेतकरी दुपारी बैल चारून आले, कि वाटेवर लांबच्या लांब सुताचे बंडलं चाळवीत, सुताचा गुंता काढून भेऱ्यावर कातून, घट्ट पीळ देऊन गुंडाळून ठेवत. भेऱ्यावरच्या रंगीबेरंगी सुताचा बैलांच्या यसनी, गोंडे, मथाट्या, सर, कासरे आणि मोहरक्या करायचा कार्यक्रम सुरु. हे सर्वांना जमायचं नाही. त्यात आमचे ज्ञानदादा-नामदादा यसणी, मोहरक्या करण्यात मोठे तरबेज, त्यामुळं या काळात दोघेपण रातभर जागून लोकांच्या बैलांचे साज करून द्यायचे. तो काळंच वेगळा होता! माणसं परिस्थितीनं गरीब, पण मनानं श्रीमंत होती! माणसांना एकमेकांसाठी आणि प्राण्यांसाठी वेळ होता, परिणामी प्राणीपण माणसांना जीव लावायचे, अगदी माणसासारखा!

पोळा तसा तीन दिवसांचा सण! आधल्या दिवशी खांदेमळन! पहाटेच बैल चारून तळ्यावरून धुऊन आणायचे. माळाऊन येतांना पळसाचे मूळं काढून, ते भाजून-ठोकून त्याचे बैलांना चौरं बनवायचे. एखादं लांब मूळ सापडलं, की दादा मला त्याचा मस्त रंगीत चाबूक करून द्यायचा. तो काड्कन वाजायचा! एकदा वाजवता वाजवता पागुरा माझ्याच पायावर बसला. लय आग झाली, पिंडरिवर वळच आला! तिकडं मुरलीदादा नदीतून मोळ, पळसाचा पाचपाण्या डहाळा आणायचा. संध्याकाळी मोठ्या वाटीत लोणी-हळद टाकलेलं गायीचं दुध मोळ-डहाळ्यानं कालवून घ्यायचं. मी, नामादादा, सुदादा, मुरलीदादा गोठ्यात जाऊन पिल्या-पाखऱ्या, पदम्या-कंबळ्याचे खांदे मळायचो. खांदे मळनाराला एकानं विचारायचं, काय करायला ? त्यानं खांदा मळत मळत पिल्याचा खांदा मळायलो असं उत्तर द्यायचं. असं तीन वेळा झालं की, त्या बैलाचं नाव घेऊन त्याच्या कानात आज आवतन, उद्या जेवायला हाये हो! सांगून पितळची परात बैलाच्या कानात वाजवायची. खांदे मळणीचा जेवायचा बेतही विशेषच! वरण-फळं, त्यावर घरचं तूप अन सोबत गावरान मिरचीचा झणझणीत ठेचा! लय मज्जा यायची !

पहाटेपासूनच पोळ्याची लगबग सुरु व्हायची! माय-बाबा-भाबी घरि तयारी करायचे. बाबा जू आणून रंगवायचे. खंडोबा, मसोबा, मुंज्या, असराया, खंडोबा या देवांना शेंदूर लावणे, नारळ फोडण्याचे काम आमच्याकडं! पोळ्याची खरी तयारी सुरु व्हायची दोन-अडीच वाजल्यापासून. आपापल्या कोठ्यासमोर लोकं बैल सजवायचे. धुतलेले बैल मस्त दिसायचे! शिंगं शेपूट-गोंडे करायचे. शिंगांना वारणीस अन त्यावर रंगीबेरंगी बेगडं. शिंगाला चौरं, शेंगुळे, नाडा-पुडी बांधायची, गळ्यात घागरमाळा, अन पाठीवर झुली! कुणीकुणी बैलांच्या शिंगात फिरते फुलं-फुगे लावायचे! पोळा म्हणजे बैलांचं लग्न! बैलांच्या कपाळावर आरशाचे बाशिंगं उठून दिसायचं! बैल नवरदेवासारखा सजायचा! बैलाच्या पाठीवर हळदी-कुंकवाचे छापे मारायचं काम माय-भाबी करायच्या! दारात एक बाज, त्यावर एक चादर टाकलेलं, त्यावर काव-चुन्यानं रंगवलेलं जू अन हारा-डेरा! सारवलेल्या दरवाज्याच्या दिन्हीकडून काव-चुन्याचे ठिपके दिलेले! शेणामातीनं सारवलेलं घर अक्षरशः सजून जायचं! लगन घरासारखा गंध यायचा घराला! सगळं गाव बैलाच्या साजात गुंग! सालगड्याला मालक नवे कपडे घ्यायचा. सायंकाळी पाचपर्यंत सगळे लोकं सजून-धजून, बाया-पोरं नटून-थटून पारापाशी तयार! बुजुर्ग लाल-पिवळे-पांढरे पटके बांधून पाटीलकीच्या थाटात पाराकडं यायचे! आम्ही बैल धरू द्या म्हणून रडायचो, पण पोळा फिरतांना एखादं लेकरू तुडवल म्हणून आम्ही पाराच्या किंवा गुरुबुवाच्या वट्यावर बाबासोबत उभे रहायचो. बैल धरू दिला नाही म्हणून आमचा हिरमोड व्हायचा! गावातील मानकरी-पाटील आणि सर्वांचे बैल पाराच्या भोवताल आले की; अक्षता वाटल्या जायच्या. बैलांचं लग्न सुरु व्हायचं! लोक जोरजोरात मंगलाष्टक म्हणायचे! पोस्टमास्तर बबनदा, उत्तमदा, नाजुकदा, आमचे मोठे राधोजीदादा, नामादादा मंगलाष्टकं म्हणायचे! शेवटी आता सावध सावधान होऊन पोळा फुटायचा! बैल फिराय सुरुवात व्हायची! काही दारू पिलेले शेतकरी घाई करायचे, बैलांना काठ्यांनी मारायचे! भोवताल उभे असलेले मालक-लोक अरे, बैलांना मारू नका रे, हळू-हळू फिरवा रे! असे जोरजोरात ओरडायचे. पाराच्या भोवताल सगळा रखोंदोळ! कपडे शेणानं भरायचे !

पाराला येढा घालून दादा बैलं घरी आणायचा, आम्ही शेपटीसारखे मागच! माय-भाबी कुंकू लावून बैल आणि दादांना ओवाळायच्या! त्यात आमचाही नंबर लागायचा! बैलांच्या पायाची पूजा करून पुरण-पोळीचा निवद खाऊ घालायचा! एखादा बैल रुसायचा! पुरण-पोळी खायचाच नाही! मग दादा हळूच त्याच्या पाठीवून हात फिरवून त्याची समजूत-रुसवा काढायचा, अन आश्चर्य म्हणजे लगेच बैल निवद खायचा! कोण म्हणतं, प्राण्यांना भावना नसतात? बैलांना निवद खाऊ घालतांना माय-बाबांचे डोळे भरून यायचे! त्यांना वाईट दिवसांची आठवण व्हायची! सगळं भावनिक वातावरण व्हायचं! नंतर आम्ही मोठादादा, कुंडलिकदादा अन ज्ञानदादाच्या घरी बैल घेऊन जायचो! तिथंपण बैलांची पूजा व्हायची! त्यानंतर बैल गोठ्याच्या समोर बांधून आम्ही घरी यायचो.

त्यानंतर आणखीच मज्जा यायची! आमच्या गावात पोळ्याच्या दिवशी गावात घरोघर जाऊन पाया पडायची प्रथा आहे! त्यात आम्ही पोरं-सोरं आघाडीवर! सगळ्या घरी पाया पडायला जायचं! बुजुर्ग स्त्री-पुरुष पाया पडलं की, लहान पोराला नारळाचा कुटका, मोठ्या माणसांना करदोडा द्यायचे. त्यात आम्ही बळच करदोडा मागून घ्यायचो. कुणी द्यायचं तर कुणी, ये, चला पळा! म्हणून काढून द्यायचे. हे पाया पडणं विशेष! कुणाचा रुसवा-फुगवा, भांडण झालं असलं किंवा बोलणं-भाषण बंद असलं तर आजच्या दिवशी सर्वांना माफ करून पुन्हा नव्यानं संबंध जोडले जायचे! मनातील कटुता धुतली जायची! भाऊ, लेकी, सुना, चुलते, काका मोठ्यांच्या पाया पडायचे! गाव गजबजून जायचं!

पाया पडणं झालं की, आम्ही चारपाच भाऊ अन बाबा जेवायला बसायचो. चांगली भूक लागलेली असायची! पुरण-पोळी आणि त्यावर गावरान तूप! गप्पा मारत, हसत-खेळत मस्त जेवणं व्हायचे. माय, भाबी आग्रहाने वाढायच्या! पुरणपोळीसारखं गोड वातावरण व्हायचं! पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी नामादादा आणि गावातील पाच-पन्नास जन आपल्या बैलजोड्या गोरक्षनाथाच्या दर्शनाला वाईला घेऊन जायचे! बैलांची वाईची वारी झाली की पोळा संपायचा! पंचीमी-पोळ्याचे दिवस भुर्रकन उडून जायचे आणि शेतातील कामाची लगबग सुरु व्हायची.

तोसिमेंटची; पण त्यातील माय-बाबा अन मातीचा ओलावा केंव्हाच संपलाय! गावाकडं आता माय-बाबा नाहीत! आता पट्कन गावाकडं पाय वळत नाहीत! पाणी भरपूर आहे पण सगळं कसं आटल्यासारखं झालंय! दोन दादा आणि बाईचा प्रवास थांबलाय! आता आम्ही केवळ पाचच आहोत! सगळ्यांना घरं आहेत, मात्र आपापल्या घरात दोघंच आपल्या लेकरांसोबत पुरण-पोळी खाताहोत, पोळा मात्र नाही!

मनात आठवणींचे पक्षी
हळूच घिरट्या घालतात
येतील का पुन्हा ते दिवस ?
स्वतःच स्वतःशी बोलतात

सगळं आहे पण ती पोळ्याची लगबग, धावपळ, तो काव-चुन्याचा, सारवणाचा सुगंध अन ती नारळाची चव कुठंच शिल्लक नाही, आठवणींशिवाय!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ
मो. ९१५८०६४०६८

# 'उगाच का बरं भटकायचं?'



माणसाचं मन हे निसर्गाने दिलेलं एक अजब यंत्र आहे. ते एका जागी कधीच स्थिर राहत नाही. रोजचं तेच तेच जगणं, कामाचा ताण, जबाबदाऱ्यांचा डोंगर आणि घड्याळाच्या काट्यावर पळणारी दिनचर्या यांमुळे अनेकदा आयुष्यात एक प्रकारचा शिणवटा येतो. अशा वेळी मनामध्ये सहज एक विचार येतो- 'उगाच का बरं भटकायचं?' पण या 'उगाच' भटकण्या-मागेच जगण्याचा खरा सुखाचा आणि स्वतःचा शोध दडलेला असतो.

भटकंती किंवा प्रवास हा फक्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणं नसतो. ती एक आंतरिक प्रक्रिया आहे. आपण जेव्हा आपल्या नेहमीच्या चौकटीतून बाहेर पडतो, तेव्हा खऱ्या अर्थाने नव्या जगाशी आपली ओळख होते. 'उगाच का बरं भटकायचं?' या प्रश्नाचं पहिलं उत्तर म्हणजे-स्वतःला पुन्हा नव्याने भेटण्यासाठी! शहराच्या कोलाहलात आणि गर्दीत आपण अनेकदा स्वतःलाच गमावून बसतो. पण जेव्हा आपण डोंगर-दऱ्या, नद्या, शांत समुद्रकिनारे किंवा घनदाट जंगलांच्या सानिध्यात जातो, तेव्हा तिथली शांतता आपल्याशी बोलू लागते.

निसर्गाच्या या अथांग पसार्यात गआपलं अस्तित्व किती लहान आहे, याची जाणीव होते आणि अवाजवी अहंकाराचा भार आपोआप हलका होतो. भटकण्याने माणसाची नजर विस्तारते. वेगवेगळ्या प्रदेशातील लोक, त्यांची संस्कृती, राहणीमान, बोलीभाषा आणि खाद्यसंस्कृती अनुभवताना आपल्याला समजतं की हे जग किती सुंदर आणि विविधतेने नटलेलं आहे. रस्त्यात भेटणारी अनवाणी पावले, अनोळखी माणसांनी दिलेले आपुलकीचे स्मितहास्य आणि अडचणीच्या वेळी मिळालेली अनोळखी मदगगत माणसाचा माणुसकीवरचा विश्वास अधिक दृढ करते.

घरात बसून जे ज्ञान पुस्तके किंवा इंटरनेट देऊ शकत नाही, ते ज्ञान प्रत्यक्ष प्रवास आणि भटकंती आपल्याला सहजरित्या शिकवून जाते. कधीकधी उद्दिष्ट ठेवून केलेला प्रवास थकवा आणू शकतो, पण 'उगाच' केलेली भटकंती मनाला अमर्याद स्वातंत्र्य देते. कुठे थांबायचं, कुठे वळायचं, काय पाहायचं याचं कोणतंही बंधन नसतं. निसर्गाच्या कुशीत विनाकारण घालवलेला तो प्रत्येक क्षण मनावरचा सर्व ताणतणाव आणि थकवा दूर करतो.

भटकून आल्यानंतर जेव्हा आपण पुन्हा आपल्या कामावर परततो, तेव्हा मनात एक नवी ऊर्जा, नवं चैतन्य आणि सकारात्मकता भरलेली असते. भटकणं हे मनाचं टॉनिक आहे. ते आपल्याला जगायला शिकवतं, कठीण प्रसंगांना सामोरं जाण्याचं धैर्य देतं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपल्या जगण्याला एक नवीन अर्थ देतं. म्हणून, जेव्हा जेव्हा आयुष्य निरस वाटू लागेल, मनावर थकवा येईल, तेव्हा कोणतंही मोठं कारण न शोधता, पाठीवर पिशवी टाकावी आणि निघून पडावं... कारण या विनाकारण भटकण्यातच जगण्याचा खरा आणि दर्जेदार सुखाचा वाटा दडलेला आहे!

**-सोनू दरेगावकर,**
नांदेड
मो. ७५०७१६१५३७

# पावसाने ओढ दिली; भोकर तालुक्यात पिके माना टाकू लागली!

## पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड; आभाळाकडे डोळे लावून बळीराजा चिंतेत

**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटाच्या छायेत आला आहे. पावसाअभावी शेतातील उभी पिके कोमेजू लागली असून, अनेक ठिकाणी पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली आहे. हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम पावसाच्या लहरीपणामुळे धोक्यात येण्याची भीती निर्माण झाल्याने शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत.



तालुक्यात यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप पिकांची पेरणी केली. सुरुवातीला झालेल्या पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली. मात्र त्यानंतर पावसाने अचानक मोठी विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. शेतात पीक उभे आहे; मात्र जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने पुढील काही दिवसांत पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

भोकर तालुक्यात सोयाबीन, कापूस, तूर यांसह विविध खरीप पिकांची लागवड केली जाते. सध्या पावसाचा खंड वाढल्याने विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या शेतजमिनीतील पिकांवर त्याचा परिणाम जाणवत आहे. काही भागांत पिकांची वाढ खुंटली असून, पाने वाळण्यास सुरुवात झाल्याचे शेतकरी सांगत आहेत.

पावसाची प्रतीक्षा करताना शेतकऱ्यांसमोर आता पीक वाचवायचे कसे? हा सर्वात मोठा प्रश्न उभा राहिला आहे. महागडी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीचा खर्च करून उभे केलेले पीक पाण्याअभावी वाया जाण्याची वेळ आल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची शक्यता आहे.

दिवसभर आकाशात ढग जमा होत असले तरी प्रत्यक्षात पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची निराशा वाढत आहे. हवामान विभागाच्या अंदाजावर शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून, गावागावांत पावसाच्या चर्चेलाच उधाण आले आहे. आज पाऊस येईल का? या एका प्रश्नाभोवती शेतकऱ्यांचे दिवस सुरू आणि संपत आहेत.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सध्या तरी कोणताही पक्ष व संघटना पुढे येऊन मागणी केली नसली तरी पावसाचा खंड आणखी वाढल्यास पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करून प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेणे गरजेचे आहे. नुकसानग्रस्त भागांची पाहणी, आवश्यक असल्यास पीक नुकसानीचे पंचनामे, पीक विम्याच्या दाव्यांबाबत मार्गदर्शन आणि शासनाच्या निकषानुसार मदतीची कार्यवाही याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पावसाचा खंड नेमका किती दिवसांचा झाला आहे, तालुक्यातील मंडळनिहाय पर्जन्यमान किती आहे, कोणत्या गावांतील पिकांवर सर्वाधिक परिणाम झाला आहे आणि कृषी विभागाने आतापर्यंत कोणती उपाययोजना केली आहे, याची अधिकृत आकडेवारी समोर येणे आवश्यक आहे. कारण केवळ अंदाजावर नव्हे, तर प्रत्यक्ष शेतातील परिस्थितीच्या आधारे प्रशासनाने निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

# सीबीसीएस पॅटर्नच्या एटीकेटी, एफ-एटीकेटी विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सीबीसीएस पॅटर्नच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील एटीकेटी, एफ-एटीकेटी तसेच पदव्युत्तर द्वितीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत महत्त्वपूर्ण सूचना जारी केली आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या दि. ४ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार, संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावयाची असून, भरलेले अर्ज १ ऑक्टोबर, २०२६ रोजी विद्यापीठात सादर करावयाचे आहेत. संबंधित विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे विद्यापीठाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येणार असून, संबंधित विद्यार्थ्यांची परीक्षा ३१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत घेण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षेनंतर उत्तरपत्रिकांची तपासणी करून गुणयादी व उत्तरपत्रिका विद्यापीठाच्या केंद्रीय मूल्यमापन केंद्रात १६ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत सादर करावयाच्या आहेत. तसेच प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या संबंधित विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत परीक्षा अर्ज भरून परीक्षा प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

# शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य हीच गुरुदक्षिणा –येरेकार



**किनवट (प्रतिनिधी)–** विद्यार्थिनींनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन स्वतःची प्रगती साधावी, हीच शिक्षकांना दिलेली खरी गुरुदक्षिणा आहे, असे प्रतिपादन ॲड. सुनील येरेकार यांनी केले.

राजकुंवर महिला महाविद्यालय, किनवट येथे शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.त्याप्रसंगी ते बोलत होते. यानिमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धा व भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. एस. पी. गायकवाड होते. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत ज्ञान, शिस्त आणि परिश्रम यांच्या बळावर यश संपादन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विश्वजित भवरे यांनी सादर केलेल्या कवितेने उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थिनींनी शिक्षकांचे समाजातील योगदान, शिक्षणाचे महत्त्व आणि आदर्श शिक्षक या विषयांवर भाषणे केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डी. बी. गिरभिडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. कुलकर्णी डी. के., प्रा.पाटील एन. पी., प्रा. ओदीवार के. व्ही., प्रा. कनाके एस. जी., प्रा. गावत्रे पी. टी., प्रा. मोरे डी. पी., प्रा. राजपूत ए. आर., प्रा. अन्नेलवार ए. आर., प्रा. सोनुळे पी. जी. तसेच श्रीमती जाधव के. व्ही. यांनी प्रयत्न केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रा. कुलकर्णी डी. के. यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बैलपोळा सणानिमित्ताने सर्जा राजाच्या सजावटीसाठी सिडको बाजारपेठ सजली

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** बैलपोळा सणा निमित्ताने विविध आकर्षक पूजेसाठी बैलांच्या मूर्ती सिडको बाजारात अनेक ठिकाणी उपलब्ध झाल्या असून, शेतकरी राजाने बैल सजावटीसाठी लागणारे अनेक साहित्य सिडको-हडको भागातील अनेक दुकानात सजावटीसाठी लागणारे साहित्य उपलब्ध झाले आहे.




सर्जा राजाच्या सजावटीसाठी लागणारे आकर्षक रंगीबेरंगी दोरी, झुली, गोंडे, बाशिंग, मोरखी, यसन, केसाळी, गोंडा यासह विविध साहित्य मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध झाले आहे. सिडको - हडको शहराच्या आजूबाजूला असलेल्या ग्रामीण भागातील गावातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यासाठी गर्दी केली आहे.

नांदेड ग्रामीण स्टेशन हद्दीत असलेल्या ३२ ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत ३९ गावांत सोमवारी १० सप्टेंबर रोजी बैलपोळानिमित्त प्रत्येक गावात पोलीस बंदोबस्त देण्यात आला आहे.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या जवळपास ३९ गावांत सोमवार, दि. १० सप्टेंबर रोजी पोळा सण साजरा होणार असून, या निमित्ताने पोलीस अधीक्षक डॉ. निलभ रोहन व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशानुसार सहायक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार, महिला पोलीस कर्मचारी, होमगार्ड बंदोबस्तासाठी गावनिहाय देण्यात आले आहेत, अशी माहिती गोपनीय शाखेचे बालाजी दंतापल्ले यांनी दिली आहे.

# प्रकाशराव बालाघाटे (घोगरे) यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)–** शहरातील तलाठी कॉलनी परिसरातील ज्येष्ठ नागरीक प्रकाश संभाजीराव बालाघाटे (घोगरे) यांचे अल्पशा आजाराने बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. राष्ट्रीय भटक्या विमुक्त जाती-जमाती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बालाघाटे, सहशिक्षक देविदास बालाघाटे, केंद्रप्रमुख बालाजी बालाघाटे, सहशिक्षक पुरुषोत्तम बालाघाटे यांचे ते वडील होत.

# महाराष्ट्रातील समाज पाठीशी उभा राहिल्याने माझा सन्मान –नंदकुमार गादेवार

**हदगाव (प्रतिनिधी)–** संपूर्ण महाराष्ट्रातील आर्य वैश्य समाज माझ्या पाठीशी एकजुटीने उभा राहिला म्हणून मी समाजाचे कार्य करू शकलो. त्या कार्याची अनेक संस्थांनी दखल घेऊन मला पुरस्कार दिले. तसेच एका दैनिकाने माझ्या कार्याची दखल घेऊन विदेशामध्ये समाजसेवक पुरस्कार दिला. तो पुरस्कार माझा एकट्याचा नसून सर्व समाजाचा आहे, असे प्रतिपादन नंदकुमार गादेवर यांनी केले. हदगाव येथे आर्य वैश्य समाजाच्या आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.



या कार्यक्रमास महासभेचे महाराष्ट्र कोषाध्यक्ष अनिल शेठ मनाठकर, राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार, वृक्ष संवर्धन वृक्ष लागवडचे डॉ. कमठाने, नांदेड जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष प्रभाकर पत्तेवार, राज्य कार्यकारिणीचे सदस्य शिरीष मनाठकर, राजेश्वर रामलाल आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गादेवार म्हणाले की, समाजाचे संघटन झाले पाहिजे. समाज एकसंघ राहिला पाहिजे. महाराष्ट्रात महासभेच्या १८ जिल्ह्यांत महासभा व महिला महासभा स्थापन झाल्या. दर तीन वर्षांनी कार्यकारिणीत बदल करून सर्वांना सामावून घेऊन हे कार्य पुढे नेत आहोत. काशी अन्न सत्रमच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दरवर्षी तीन कोटींचे वाटप करण्यात येते. समाजातील गोरगरिबांना उपजीविका भागविण्यासाठी महासभेच्या वतीने शिलाई मशीन, पिठाची गिरणीचे वाटप केले जाते. प्रत्येकजण मेहनत करत असतो, पण नशिबाने साथ दिली पाहिजे. समाज संघटित झाला तर कोणाची ताकद आपल्याशी वैर करण्याची राहत नाही, असे ते म्हणाले.

तिरुपती येथे आपले भक्त निवास होत असून, त्यासाठी एक एकर जागा आपण मोफत मिळवली आहे. त्यावर आपली भक्तनिवास १०२ रूममध्ये तयार होत आहे. त्यासाठी २५ कोटी रुपये लागणार आहेत. आपण १५ कोटी रुपये तयार केले आहेत. तेही कोणाच्या घरी न जाता जमा केले, यावरून समाजाची ताकद काय आहे समजते असेही ते म्हणाले.

मराठवाड्यात प्रथमच नांदेड येथे वासवी अर्बन बँकेची स्थापना केली. केवळ तीन महिन्यांमध्ये साडेचार कोटी जमा झाले तर तीन कोटी तीस लाखांचे कर्ज देखील वाटप केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राम वट्मवार यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. संतोष मामीडवार, मनोज करचलवार, विजय व्यवहारे, प्रशांत मुक्कावार, उदय गंधेवार, डॉ. गजानन कवटीकवार, वसंत पत्तेवार, किरण व्यवहारे, सुरेश तुम्सेवार, सुरज अमीलकंठवार, प्रितम पत्तेवार, प्रवीण गंधेवार, गजानन रेवणवार, सागर गंधेवार आदींनी परिश्रम घेतले.

# यशवंतराव चव्हाण पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी जी. एस. मंगनाळे

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्था नांदेडच्या तज्ज्ञ संचालकपदी पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष जी. एस. मंगनाळे व भगवान बकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. बैठकीनंतर सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रांत संघटनमंत्री सुरेश दंडवते, दत्तप्रसाद पांडागळे, संजय कोठाळे, बालाजी बामणे, दिगंबर कुरे, व्यंकट गंदपवाड, जी.बी. मोरे, तस्लीम शेख, शंकर हासगुळे आदी उपस्थित होते.

# यशवंत महाविद्यालयात आयोजित विशेष व्याख्यानाला विद्यार्थिनींचा प्रतिसाद




**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयात महिला सुधार व सुरक्षा समितीच्या वतीने माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाला विद्यार्थिनींनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी नांदेड येथील सहायक पोलीस निरीक्षक वर्षा प्रभाकरराव डहाळे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी भूषविले. प्रारंभी प्रास्ताविक डॉ. मंगल कदम यांनी केले.

वर्षा प्रभाकरराव डहाळे यांनी मार्गदर्शनात, वास्तव जीवनाचे, समाजात घडलेले अनेक प्रसंग सांगत विद्यार्थिनींना तसेच महिला प्राध्यापिका आणि कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना वर्षा डहाळे म्हणाल्या की, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थिनींनी आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करायला हवे. सोशल मीडियाचा वापर करून कोणीही त्रास देत असतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करता येतो. महाराष्ट्र सरकारने रॅगिंगसाठी सुद्धा कायदा केला आहे. विद्यार्थिनी आणि महिला जर अडचणीमध्ये असतील तर त्यांनी केव्हाही ११२ हा नंबर डायल करावा. महिलांच्या आपातकालीन मदतीसाठी व सेवेसाठी हा नंबर आहे. अभ्यासाच्या दिशेने आज विद्यार्थिनी न वळता आभासी दुनियत जास्त गर्क होत आहेत. सोशल मीडियाचे अनेक दुष्परिणाम वास्तव उदाहरणातून त्यांनी सांगितले तसेच उदाहरणे देत विद्यार्थिनींच्या अनेक प्रश्नांची उकल देखील केली.

अनेकदा कायद्याची पुरेशी माहिती नसल्यामुळे किंवा केवळ भीतीपोटी सुद्धा महिलांद्वारे अन्यायाविरुद्ध आवाज उठविला जात नाही. महिलांना सुरक्षिततेबाबत हक्क, अधिकार, कायदा याचे महत्त्व सांगून कोणीही छेडछाड केली तर त्यावर कोणता कायदा आहे, कौटुंबिक हिंसाचाराबाबत काळजी घ्यावी, यासाठी पोलीस यंत्रणा कशी कार्यरत आहे, या गोष्टींचे सखोल मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्रा. राजश्री भोपाळे यांनी केले तर अध्यक्षीय समारोप डॉ. कविता सोनकांबळे यांनी केला. शेवटी आभार डॉ. मीरा फड यांनी मानले.

# अर्धापूर येथे धनगर समाजाच्या विविध मागण्यांसाठी तहसीलदारांना निवेदन; मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे (ST) आरक्षण तात्काळ लागू करावे, यासह विविध मागण्यांसाठी सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी धनगर समाजाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



शासनाने धनगर आरक्षणाची कायदेशीर लढाई सर्वोच्च न्यायालयात पूर्ण ताकदीने लढावी आणि गरज पडल्यास 'प्लॅन-बी' तयार ठेवावा, अशी मुख्य मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय: मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे. श्री संत बाळूमामा देवस्थान ट्रस्टसाठी स्वतंत्र शासकीय कायदा करून त्यात मूळ मेंढपाळ समाजाचा प्रभावी सहभाग निश्चित करावा.

लोणावळा येथील कनेक्टिंग लिंकला हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव द्यावे. शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा धनगर समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, 'धनगर समाजभूषण' ज्ञानदीप साखरे, गोविंद साखरे, सचिन बारसे, अशोक कानोडे, अजिंक्य काकडे, हरी कानोडे, भैय्या अबुके, राज अबूके, रोहिदास मुधळे, शिवशंकर परडकर, अनुज साखरे, अमृत खोंडे, सुदर्शन बेळगे, मुंजाजी दळवे, राजकिरण साखरे, केरबा साखरे, नवनाथ बारसे, नागोराव बारसे, आदिराज कानोडे, अमोल कानोडे आणि पुरुषोत्तम बारसे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभागातील मूलभूत सुविधा सोडविण्यासाठी कटिबद्ध, लोकप्रतिनिधींचे आश्वासन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २० मधील राहुलनगर, वाघाळा, शाहु नगर, कनिष्क नगरासह विविध भागात प्रत्यक्ष भेटी देऊन रस्ते, नाले, मल-निःसारण समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन परिसरातील नगरसेवकांनी नागरिकांना दिले.

मनपाच्या प्रभाग क्रमांक २० मधील भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश बसवदे, राजू लांडगे यांनी ६ सप्टेंबर रोजी सकाळी प्रभागातील शाहु नगर, वाघाळा, राहुल नगर व विविध भागात भेटी देऊन नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेऊन मूलभूत सुविधा अंतर्गत पाणी, रस्ते, दिवाबत्ती, नाले यासह परिसरातील समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी प्रामुख्याने नाली, मलनिःसारण चेम्बर, साफसफाई आदी पाहणी करून नागरीकाशी चर्चा केली व परिसरातील मोकळ्या मैदानावर झालेली झाडे झुडपे तात्काळ स्वच्छता विभागाच्या वतीने काढुन देऊन परिसरात अनेक भागात साफसफाई केली.

# डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराने स्वारातीम विद्यापीठातील दोन प्राध्यापकांचा गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे प्रदान करण्यात येणारा अत्यंत प्रतिष्ठित 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील दोन वरिष्ठ प्राध्यापकांना जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तावाढीसाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत वर्ष २०२४- २५ साठी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि वर्ष २०२५-२६ साठी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि विद्यापीठ परिसरात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्राध्यापकांच्या योगदानाचा गौरव करणे हा या पुरस्काराचा प्रमुख उद्देश आहे. २५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात प्रशासकीय गतिशीलता व पारदर्शकता, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, संशोधन संस्कृतीचा विकास तसेच विविध शैक्षणिक भागीदारींच्या माध्यमातून गुणवत्तावाढीसाठी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची राज्य शासनाने घेतलेली दखल ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

हा पुरस्कार महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि कला शिक्षण संचालक डॉ. किशोर इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार व नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांचे अभिनंदन केले. तसेच व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद व अधिसभेचे सदस्य, विद्यापीठातील प्राध्यापक आणि अधिकारी- कर्मचाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या नेतृत्वाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला वर्ष २०२४- २५ आणि २०२५-२६ अशा सलग दोन वर्षांसाठी डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त होणे ही अत्यंत समाधानाची बाब आहे. या सन्मानामुळे विद्यापीठाचा शैक्षणिक क्षेत्रातील बहुमान निश्चितच अधिक उंचावला आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन

**लोहा (प्रतिनिधी)–** शासनाने धनगर समाजाला अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातून आरक्षणाची तत्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी लोहा तालुक्यातील सकल धनगर समाजाचे ज्येष्ठ नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव पाटील हाके यांच्या नेतृत्त्वाखाली करण्यात आली. लोहा तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्यामार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले.

महाराष्ट्रातील तमाम धनगर जमातीच्या प्रलंबित व न्याय्य मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी ७ सप्टेंबर २०२६ रोजी लोहा तहसीलदारांना हे निवेदन सुपूर्द करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयात प्रभावी बाजू: सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली विशेष अनुज्ञा याचिका महाराष्ट्र शासनाने पूर्ण ताकदीने आणि गांभीर्याने लढवावी. आरक्षणाच्या समर्थनार्थ सर्व कायदेशीर व घटनात्मक बाबी स्पष्ट करणारे ठोस प्रतिज्ञापत्र दाखल करून सक्षम वकिलांची नियुक्ती करावी.

'प्लॅन-बी' तयार ठेवावा: एसटी आरक्षणाबाबत कोणताही प्रतिकूल निर्णय आल्यास धनगर समाजाला एसटीचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने पर्याय म्हणून 'प्लॅन-बी' तयार ठेवावा.

श्री संत बाळूमामा देवस्थान ट्रस्टसाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा. विश्वस्त मंडळात किमान २१ विश्वस्त असावेत आणि अध्यक्षपद धनगर समाजातील व्यक्तीला दिले जावे.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व माजी जि. प. सदस्य भगवानराव पाटील हाके यांनी केले. यावेळी यशवंत सेनेचे जिल्हाध्यक्ष माधव डोईफोडे, तालुकाध्यक्ष पांडुरंग धुळगुंडे, टायगर ग्रुपचे तालुका उपाध्यक्ष संदीप बाजगीर, राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नारायण कोपणर, जनशक्ती पार्टीचे तालुकाध्यक्ष गोविंद हाफगुंडे, रामतीर्थचे उपसरपंच मोहन पोले, पोलीसवाडीचे सरपंच नवनाथ पोले, लखन बाजगीर, माजी सरपंच पिराजी धुळगुंडे, पाराजी धुळगुंडे आणि संतोष जंगले यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# बाप्पाच्या आगमनाच्या वेळी नको या चुका!

गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर लोक आपापल्या घरी गणपती बसवतात आणि पूर्ण विधीपूर्वक पूजा करतात. गणेशाला समृद्धी आणि बुद्धीची देवता, असे मानले जाते. अशा सर्वांना प्रिय असलेल्या देवतेची गणेश चतुर्थीच्या दिवशी अनेक भाविक १० दिवस पूजा करतात; तर काही भक्त गणेशमूर्ती एक दिवस, तीन दिवस, पाच दिवस, सात दिवस बसवतात. असं म्हटलं जातं की, गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशमूर्ती घरात ठेवून श्रद्धेनं पूजा करणाऱ्यांची सर्व संकटं गणपती बाप्पा दूर करतो. १० दिवस चालणारा हा महोत्सव संपूर्ण भारतभरात मोठ्या आनंद आणि जल्लोषात साजरा केला जात असल्याचं पाहायला मिळतं. घरोघरी आता बाप्पाच्या आगमनाची तयाची सुरू झाली आहे. कुणाकडे सजावटीची खूप जोमानं तयारी सुरू झाली असेल, तर कोणी घरगुती वस्तूंचा वापर करून, तर कोणी बाजारात मिळणारं तयार सजावट साहित्य आणत, आपल्या बाप्पाला त्यात विराजमान करण्याच्या तयारीला लागले आहेत. गणरायाच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये यासाठी गणेशभक्तांसह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांचीही लगबग सुरू आहे. यंदाच्या गणपतीत काय करावं अन् काय नको, अशा द्विधा मनस्थितीतही अनेकांची तयारी सुरू आहे. परंतु, बाप्पाच्या आगमनापूर्वी काही गोष्टींची काळजी घेणं अतिशय आवश्यक आहे. तेव्हा बाप्पाच्या आगमनापूर्वी कोणत्या चुका टाळायला हव्यात ते आपण जाणून घेऊ...



### लक्षात ठेवा 'या' गोष्टी

- गणेशमूर्ती घरी नेण्यापूर्वी घराची स्वच्छता आणि अंघोळ करून घ्या.
- मूर्ती मातीची असावी.
- साप, गरुड, मासा किंवा युद्ध करताना व चित्र-विचित्र आकारातील गणेशमूर्ती मुळीच घरी नेऊ नये.
- गणपतीची मूर्ती घरी नेताना ती स्वच्छ कपड्याने झाकून न्या.
- तुमच्या पूजेच्या ठिकाणी पाण्याने भरलेला कलश स्थापित करा.
- श्रीगणेशाला दूर्वा अवश्य अर्पण करा.
- बाप्पाची मूर्ती घरी आणल्यानंतर घर रिकामे ठेवू नका.
- गणपतीची प्रतिष्ठापना करताना योग्य विधी आणि शुभ मुहूर्त पाळा.
- घरामध्ये बाप्पाचे वास्तव्य असल्यास केवळ सात्त्विक अन्न शिजवावे आणि त्या अन्नाचाच नैवेद्य बाप्पाला दाखववा.
- मूर्तीची पूजा आणि आरती केल्याशिवाय तिचे विसर्जन करू नये.

# घरात गणेशमूर्ती आणताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा...


**गणेश चतुर्थी कधी आहे? घरोघरी बाप्पा केव्हा विराजमान होणार? नेमकी तारीख काय, शुभ तिथी, शुभ मुहूर्त आणि महत्त्व काय? याविषयी आपण जाणून घेऊया...**

गणेश चतुर्थीला घरात गणपतीची स्थापना करणे अत्यंत शुभ मानले जाते. मात्र, गणेशमूर्तीची निवड करताना अनेकांच्या मनात एक प्रश्न असतो, गणपतीची सोंड डावीकडे वळलेली असावी की उजवीकडे? वास्तुशास्त्र आणि धार्मिक मान्यतांनुसार सोंडेच्या दिशेला विशेष महत्त्व दिले जाते. भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थीपासून गणेशोत्सवाला सुरुवात होते. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवाची सांगता अनंत चतुर्दशीला होते. या काळात भक्त मोठ्या श्रद्धेने घराघरांत आणि सार्वजनिक मंडपांमध्ये गणरायाची प्रतिष्ठापना करून विधिवत पूजन करतात.

- घरासाठी डावीकडे वळलेली सोंड शुभ : वास्तुशास्त्रानुसार घरात प्रतिष्ठापना करण्यासाठी डावीकडे वळलेली सोंड असलेली गणेशमूर्ती शुभ मानली जाते. अशा गणपतीला 'वाममुखी गणपती' असे संबोधले जाते. धार्मिक श्रद्धेनुसार, अशा मूर्तीची भक्तिभावाने पूजा केल्याने घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते, अशी मान्यता आहे.
- चार हातांच्या गणेशमूर्तीला महत्त्व : धार्मिक परंपरेनुसार चार हात असलेल्या गणेशमूर्तीची पूजा करणे उत्तम मानले जाते. गणेशाच्या वरच्या डाव्या हातात पाश, तर वरच्या उजव्या हातात अंकुश असतो. पाश अडथळे दूर करण्याचे, तर अंकुश मनावर नियंत्रण ठेवण्याचे प्रतीक मानला जातो. खालच्या डाव्या हातातील मोदक आनंद आणि फलप्राप्तीचे प्रतीक मानला जातो, तर उजवा हात अभयमुद्रेत असून तो संरक्षणाचे प्रतीक मानला जातो.
- गणेशमूर्तीसोबत मूषक असणे महत्त्वाचे : गणेशमूर्ती खरेदी करताना तिच्यासोबत मूषकाची प्रतिकृती आहे का, याकडेही लक्ष द्यावे. मूषक हे भगवान गणेशाचे वाहन मानले जाते. त्यामुळे मूषकासह असलेली गणेशमूर्ती पूजेसाठी पूर्ण मानली जाते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.
- गणेशमूर्तीचा रंग कोणता असावा? : हिंदू धार्मिक परंपरेत विविध रंगांना विशेष महत्त्व आहे. श्रद्धेनुसार, पांढऱ्या रंगाची गणेशमूर्ती घरात समृद्धीचे प्रतीक मानली जाते. सिंदूर रंगाची मूर्ती सौभाग्याचे प्रतीक मानली जाते. पिवळ्या रंगाची गणेशमूर्ती मनात शांतता आणि पवित्रतेची भावना निर्माण करणारी मानली जाते, तर हिरवा रंग सुख-सुविधा आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो.

### मूर्ती खरेदी करताना या गोष्टी तपासा

गणेशमूर्तीचे स्वरूप प्रसन्न, शांत आणि सुंदर असावे. मूर्ती खरेदी करताना ती तुटलेली किंवा खंडित नसल्याची खात्री करून घ्यावी. पर्यावरणाचा विचार करून शाडूची माती किंवा अन्य नैसर्गिक साहित्यापासून तयार केलेल्या मूर्तीला प्राधान्य देणे योग्य ठरते.



# बाप्पासाठी करूया स्वस्तात मस्त डेकोरेशन!

**यंदा १४ सप्टेंबरला घरोघरी बाप्पा विराजमान होतील. त्यामुळे सर्वत्र बाप्पाच्या आगमनासाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. बाप्पा येणार म्हटल्यावर त्यांच्या स्वागतासाठी खास सजावटही हवीच. तर कॉलेज, शाळा, नोकरीतून वेळ काढून सजावट कशी करावी, असा प्रश्न अनेकांसमोर उभा राहतो. पण, तरीही या सगळ्यातून वेळ काढून, तयार डेकोरेशन न आणता छोट्या- छोट्या गोष्टी जमवून, अगदी कमी वेळात घरच्या घरी सजावट करण्याचा प्रयत्न प्रत्येकाचा असतो. जर तुम्हीसुद्धा असंच काही करण्याच्या प्रयत्नात असाल तर आणि तुम्हाला सजावटीसाठी कल्पना सुचली नसेल तर तुम्ही पुढील काही पर्यायांचा विचार करू शकता...**



### रंगीबेरंगी पंखे...

रंगीबेरंगी पंखे बनवण्यासाठी तुमच्या आवडीच्या रंगांचे कार्ड पेपर खरेदी करा. प्रत्येक कार्ड पेपरला छोट्या किंवा मोठ्या आकारात आयताकृती आकारात कापून घ्या. आपण शाळेत पंखा बनवायचो त्याप्रमाणे प्रत्येक कागद एकदा सरळ आणि एकदा उलट्या दिशेने घडी घालण्यास सुरुवात करा. असे दोन सारख्या रंगाचे पंखे तयार झाले की, एका पंख्याचे शेवटचे आणि दुसऱ्या पंख्याचे सुरुवातीचे टोक तर नंतर एका पंख्याचे सुरुवातीचे व दुसऱ्या पंख्याचे शेवटचे टोक चिटकवून घ्या आणि स्टॅप्लर सुद्धा लावा. अशाप्रकारे तुमचा एक वर्तुळाकार आकाराचा एक मोठा पंखा तयार होईल. अशापद्धतीने तुम्ही रंगीबेरंगी पंखे तयार करून घ्या. त्यानंतर एक मोठा पुठ्ठा घेऊन त्यावर हे सगळे पंखे टाचण्यांच्या साहाय्याने लावून घ्या. फळीच्या साहाय्याने हा पुठ्ठा उभा करा आणि भिंतीला खिळ्यांच्या मदतीने लावून घ्या. अशाप्रकारे तुमचे डेकोरेशन तयार.



- फुले व नेटचे कापड : सगळ्यात पहिला भिंतीला दोन वर, दोन खाली असे चार खिळे ठोका. नंतर एक प्लेन रंगाचा कापड खिळ्यांच्या, दोरीच्या साहाय्याने व्यवस्थित बांधून घ्या. त्यानंतर तुम्हाला आवडतील त्या दोन रंगाचे नेटचे कापड घ्या आणि विरुद्ध दिशेने लावण्यास सुरुवात करा. म्हणजेच उजव्या बाजूने एका रंगाच्या पाच आडव्या रेषा तर डाव्या बाजूने दुसऱ्या रंगाच्या पाच आडव्या रेषा अशाप्रकारे कापडावर लावून घ्या. जेणेकरून फोटोत दाखवल्याप्रमाणे काजू कतली सारखा आकार दिसू लागेल. त्यानंतर बाजारातून नकली फुलांच्या दोन रंगाच्या एक किंवा दोन माळा विकत आणा आणि प्रत्येक फूल षटकोनाच्या वरच्या व खालच्या बाजूस येईल अशाप्रकारे लावून घ्या. अशाप्रकारे तुमचे फुलं व नेटचे कापड डेकोरेशन तयार.
- विटा व पाने : बाजारातून फोम विकत आणा. विटांच्या आकारात फोम कापून घ्या. नंतर फोमला विटांचा रंग देण्यासाठी गेरू पाण्यात रात्रभर भिजवून ठेवा. दुसऱ्या दिवशी विटांना रंग देण्यास सुरुवात करा. शक्यतो एकाच दिवशी विटांना रंग करून घ्या आणि रात्रभर त्यांना तसंच ठेवून द्या . जिथे गेरू बसणार नाही तिथे तुम्ही ॲक्रेलिक वॉटर कलरचा उपयोग करून फिनिशिंग करू शकता. बाजारातून नकली पानांची माळ घेऊन या. त्यानंतर भिंतीवर एक प्लेन रंगाचे कापड लावून घ्या. दोऱ्याच्या साहाय्याने नकली पाने शिवून कापडावर लावून घ्या. त्यानंतर विटा तयार झाल्या की टूथपिक व टाचण्यांच्या मदतीने या विट्या क्रमाने लावून घ्या. अशाप्रकारे तुमचे विटांचे डेकोरेशन तयार.
- जास्वंद व रंगीबेरंगी फुलांची सजावट : पांढऱ्या रंगाचे एका मोठा कार्ड पेपर घ्या. त्यावर जास्वंदाचे चित्र काढा. त्याला लाल रंग द्या. हिरव्या रंगाचा क्राफ्ट पेपर घेऊन त्यावर पानांचे चित्र काढून कापून घ्या. जास्वंदाचे फुल व हिरव्या रंगाचे पान तयार. तसेच रंगीबेरंगी फुले बनवण्यासाठी वेगवेगळ्या रंगाचे कार्ड पेपर बाजारातून घेऊन या. कार्ड पेपरला पाकळ्यांची डिझाईन काढून घ्या आणि त्याच आकारात कैचीने कापून घ्या आणि गम किंवा फेव्हिकॉलच्या साहाय्याने पाकळ्यांचा मधला भाग चिटकवून घ्या. तुऱ्यांची फुलं बनवण्यासाठी कार्ड पेपर आयताकृती कापून घ्या आणि त्या पेपरचा चौरस होईल अश्या घडी घालून घ्या. घडी घातल्यानंतर समान अंतर ठेवून कापण्यास सुरुवात करा, मग फोटोत दाखवल्याप्रमाणे तुमची तुऱ्यांची फुलं तयार. ही सगळी फूल चिटकवण्यासाठी फोटोत दाखवल्याप्रमाणे वॉलशीटचा वापर करा आणि टाचण्यांच्या सहाय्याने या वॉल शीटवर फुले चिटकवून घ्या आणि गणपतीच्या अगदी मागच्या बाजूला मधोमध जास्वंदाचे फुल चिटकवून घ्या. अशाप्रकारे तुमचे जास्वंद व रंगीबेरंगी फुलांचे डेकोरेशन तयार.
- पत्रावळ्यांची सजावट : तुमच्याकडे जुन्या पानांच्या पत्रावळ्या व द्रोण असतील किंवा तुमची बाजारातून सुद्धा विकत आणू शकता. भिंतीला एक प्लेन कापड लावा. पत्रावळ्या आणि कापडाला धाग्यांनी शिवून घ्या आणि पत्रावळ्यांच्या मधोमध द्रोण लावून घ्या. अशाप्रकारे तुमचे डेकोरेशन तयार. या सगळ्या सजावटी दरम्यान तुम्ही लाइटिंग व फोकसचा वापर सुद्धा करू शकता. ज्यामुळे डेकोरेशन आणखीन उठून दिसेल.

# गणेश चतुर्थी 14 की 15 सप्टेंबरला? जाणून घ्या अचूक तारीख, महत्त्व अन् पूजा विधी...

**भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीपासून गणेशोत्सवाला सुरुवात होते. दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात घरोघरी श्रीगणेशाची स्थापना करून विधिवत पूजा केली जाते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशमूर्तीचे विसर्जन करून उत्सवाची सांगता होते. यंदा गणेश चतुर्थी १४ सप्टेंबरला की १५ सप्टेंबरला, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम आहे. जाणून घेऊया गणेश चतुर्थीची अचूक तारीख, पूजा विधी आणि या दिवसाचे धार्मिक महत्त्व...**

पंचांगानुसार, भाद्रपद शुक्ल पक्षातील चतुर्थी तिथीची सुरुवात १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ७ वाजून ६ मिनिटांनी होईल. ही तिथी १५ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी समाप्त होईल. धार्मिक मान्यतेनुसार, भगवान गणेशांचा जन्म दुपारच्या वेळी झाला होता. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी दुपारच्या काळात असलेल्या चतुर्थी तिथीला विशेष महत्त्व दिले जाते. या गणनेनुसार यंदा गणेश चतुर्थीचा उत्सव १४ सप्टेंबर २०२६ रोजी साजरा केला जाणार आहे. या दिवशी घरोघरी आणि सार्वजनिक मंडपांमध्ये श्रीगणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. पुढील दहा दिवस गणरायाची भक्तिभावाने पूजा-अर्चा केली जाते. गणेश चतुर्थी हा भगवान श्रीगणेशांच्या जन्मोत्सवाचा दिवस मानला जातो. श्रीगणेश हे बुद्धी, ज्ञान, समृद्धी आणि शुभत्वाचे दैवत मानले जातात. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करण्यापूर्वी श्रीगणेशाचे पूजन करण्याची परंपरा आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करून भक्तिभावाने पूजा केली जाते. गणेशोत्सवाचा समारोप अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशमूर्तीच्या विसर्जनाने होतो.

## श्रीगणेशाची स्थापना कशी करावी?

- पूजास्थळाची स्वच्छता करा : ज्या ठिकाणी श्रीगणेशाची स्थापना करायची आहे, ते ठिकाण प्रथम स्वच्छ करून घ्यावे.
- लाल वस्त्र अंथरावे : पूजेच्या ठिकाणी स्वच्छ लाल रंगाचे वस्त्र अंथरावे.
- श्रीगणेशाचे ध्यान करावे : गणपतीची मूर्ती विधिवत आसनावर ठेवून श्रीगणेशाचे ध्यान करावे. त्यानंतर आचमन करून पूजेसाठी आवश्यक साहित्य अर्पण करावे.
- सिंदूर, दूर्वा, फुले आणि अक्षता अर्पण कराव्यात : सर्वप्रथम श्रीगणेशाला सिंदूराचा टिळा लावावा. त्यानंतर दूर्वा, फुले आणि अक्षता अर्पण कराव्यात.
- गणेश मंत्रांचा जप करावा : पूजेदरम्यान श्रीगणेशाच्या मंत्रांचा श्रद्धेने जप करावा.
- आरती आणि कथा करावी : पूजा पूर्ण झाल्यानंतर श्रीगणेशाची आरती करावी. त्यानंतर गणेशाची कथा ऐकावी किंवा वाचावी आणि नैवेद्य अर्पण करावा.
- मोदकाचा नैवेद्य दाखववा : श्रीगणेशाला मोदक अत्यंत प्रिय असल्याची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी गणरायाला मोदकाचा नैवेद्य अवश्य दाखववा.

## गणेश चतुर्थीला चंद्रदर्शन का टाळावे?


धार्मिक मान्यतेनुसार, भाद्रपद शुक्ल पक्षातील चतुर्थीच्या दिवशी चंद्राचे दर्शन घेणे वर्ज्य मानले जाते. या दिवशी चंद्रदर्शन केल्यास व्यक्तीवर खोटा आरोप किंवा कलंक येऊ शकतो, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्रदर्शन टाळण्याची परंपरा आहे.

## श्रीगणेशाला दूर्वा का अर्पण केली जाते?

श्रीगणेशाच्या पूजेत दूर्वेला विशेष महत्त्व आहे. धार्मिक मान्यतेनुसार दूर्वा ही गणरायाला अत्यंत प्रिय आहे. त्यामुळे गणेशपूजेत दूर्वा अर्पण करण्याची परंपरा आहे. पूजेसाठी दूर्वांच्या छोट्या छोट्या जुड्या किंवा गाठी तयार करून त्या श्रीगणेशाला अर्पण केल्या जातात. दूर्वा एकत्र करून त्यांना कलावा बांधल्यानंतर गणरायाला अर्पण करण्याची पद्धतही प्रचलित आहे.

# हरतालिकासाठी साडीऐवजी प्रियंका चोप्रांचा स्टायलिश सूट लुक; पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड

**विवाहित महिलांसाठी हरतालिका तीज हा अत्यंत महत्त्वाचा आणि विशेष सण मानला जातो. या दिवशी महिला पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास करतात. तसेच पारंपरिक पद्धतीने नटून-थटून माता पार्वती आणि भगवान शंकराची पूजा करतात. त्यामुळे या दिवशी आकर्षक आणि पारंपरिक पेहराव करण्याकडे महिलांचा विशेष कल असतो. हरतालिका तीजसाठी नेहमी साडी किंवा पारंपरिक पोशाख करण्याचा विचार करत असाल, तर यंदा अभिनेत्री प्रियंका चोप्रांच्या आकर्षक सूट लुकपासून प्रेरणा घेऊ शकता. पारंपरिकतेला आधुनिक शैलीची जोड देणारा त्यांचा हा पेहराव सणासाठी अगदी योग्य ठरू शकतो.**



- केशरी आणि सोनेरी रंगांची आकर्षक सांगड : प्रियंका चोप्रांनी परिधान केलेल्या पोशाखात केशरी आणि सोनेरी रंगांचा सुंदर मिलाफ दिसून येतो. सणासुदीच्या प्रसंगासाठी हे रंग विशेष उठून दिसतात. त्यांनी कमी लांबीचा, बाह्या नसलेला कुर्ता परिधान केला होता. कुर्त्याच्या गळ्याभोवती अतिशय नाजूक भरतकाम करण्यात आले होते. त्यामुळे साध्या दिसणाऱ्या कुर्त्याला आकर्षक आणि श्रीमंती स्वरूप प्राप्त झाले होते. कुर्त्याचा गळा खोल यू आकाराचा असल्याने संपूर्ण पेहराव अधिक उठावदार दिसत होता. या कुर्त्यासोबत त्यांनी रुंद पायघोळ आणि सरळ आकाराची सोनेरी सलवार परिधान केली होती. त्यावर घेतलेल्या केशरी रंगाच्या ओढणीमुळे संपूर्ण पेहरावाला अधिक खुलवणारी जोड मिळाली. ओढणीला रुंद आणि भरजरी भरतकामाची किनार होती. साध्या कुर्त्यासोबत ही उठावदार किनार विशेष खुलून दिसत होती.
- ओढणी घेण्याची राजेशाही पद्धत : प्रियंका यांच्या या लुकचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ओढणी घेण्याची पद्धत. त्यांनी ओढणीचा एक भाग एका खांद्यावर सैल सोडला होता, तर दुसरा भाग हाताभोवती गुंडाळला होता. ओढणी घेण्याची ही शैली पारंपरिक असून त्याला राजेशाही स्वरूपाची छटा मिळते. तसेच ओढणीवरील भरतकामाची किनारही यामुळे अधिक उठून दिसते.
- दागिन्यांमध्ये साधेपणाला पसंती : तीजच्या दिवशी अनेक महिला भरजरी दागिने परिधान करतात. मात्र, प्रियंका यांच्या या पेहरावासोबत कमीतकमी दागिने वापरूनही आकर्षक दिसता येते. त्यांनी गळ्यात नाजूक मंगळसूत्र आणि कानात उठावदार झुमके घातले होते. मंगळसूत्र साधे आणि नाजूक असल्याने मोठ्या झुमक्यांसोबतही संपूर्ण रूप अतिशय संतुलित दिसत होते.
- मेकअपही साधा आणि उठावदार : या पारंपरिक पेहरावासोबत प्रियंका यांनी चेहऱ्याचा मेकअपही अतिशय संतुलित ठेवला होता. डोळ्यांना उठाव देण्यासाठी त्यांनी सौम्य स्मोकी आय मेकअप केला होता. त्यासोबत नैसर्गिक छटा असलेली लिपस्टिक वापरली होती. चेहऱ्यावर आवश्यक तेवढेच कंटूरिंग आणि ब्लश लावण्यात आले होते. त्यामुळे त्यांचा चेहरा अधिक खुलून दिसत होता. पारंपरिक लुक पूर्ण करण्यासाठी त्यांनी कपाळावर छोटी बिंदी लावली होती. हरतालिका तीजच्या निमित्ताने हा लुक करताना विवाहित महिला बिंदीसोबत कुंकू किंवा सिंदूरही लावू शकतात. त्यामुळे पेहरावाला अधिक पारंपरिक स्पर्श मिळेल.
- मोकळे कुरळे केस लुकला देतात वेगळीच झळाळी : प्रियंका यांनी केस एका बाजूला घेत मोकळे सोडले होते. केसांना हलके कुरळे वळण दिल्यामुळे त्यांना भरपूर घेर आणि उठाव मिळाला होता. पारंपरिक पोशाख, आकर्षक दागिने, साधा मेकअप आणि मोकळे कुरळे केस यांचा सुंदर मेळ साधत प्रियंका चोप्रांनी हा लुक पूर्ण केला होता. त्यामुळे हरतालिका तीजला साडीऐवजी काहीतरी वेगळे आणि आधुनिक परिधान करण्याची इच्छा असणाऱ्या महिलांसाठी हा सूट लुक नक्कीच प्रेरणादायी ठरू शकतो.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## अमली पदार्थांपासून दूर राहा, डायल ११२ सजगतेने वापरा

### ‘स्वारातीम’मध्ये एसपी डॉ. निलाभ यांचा तरुणाईला कानमंत्र



**नांदेड (प्रतिनिधी)**–अमली पदार्थांचे सेवन केवळ व्यक्तीचे आरोग्यच नव्हे, तर कुटुंब आणि संपूर्ण समाजाचे भवितव्य उद्ध्वस्त करते. तरुणांनी त्यापासून दूर राहून मित्रांनाही परावृत्त करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि ‘स्वयंसिद्धा’ उपक्रमाच्या वतीने ‘अमली पदार्थ प्रतिबंध, महिला सुरक्षा व वाहतूक नियम’ या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. एसपी रोहन यांनी पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आज सोशल मीडियाचा अतिवापर, सायबर गुन्हे आणि अमली पदार्थ हे तरुणांसमोर मोठे आव्हान आहे. वाहन चालवताना हेल्मेट, सीट बेल्ट वापरा, वेगावर नियंत्रण ठेवा आणि वाहतूक नियम पाळा. आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२ चा प्रभावी वापर करा, असे त्यांनी सांगितले.

महिला सहायक पोलीस निरीक्षक सुप्रिया केंद्रे यांनी महिला सुरक्षा कायदे आणि उपलब्ध यंत्रणांबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, डॉ. बाबासाहेब सुरवसे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. मारुती गायकवाड यांनी केले, तर डॉ. नीना गोगटे यांनी आभार मानले.

## गोदावरी पात्रात एका रात्रीत पोलिसांच्या ५ कारवाया, १.१५ कोटीचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– गोदावरी नदीपात्रातील अवैध रेती उपसा आणि वाहतुकीविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिसांनी एका रात्रीत ५ ठिकाणी धडक कारवाई केली. यामध्ये ९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करून १ कोटी १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने ही विशेष मोहीम राबवण्यात आली.

दि. ८ सप्टेंबर रोजी रात्री विष्णुपुरी, मार्कंड आणि नागापूर शिवारात गोदावरी पात्रात ही कारवाई झाली. तिन्ही ठिकाणी बेकायदा रेती उपसा सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा टाकला. पोलीस येताच आरोपी पळून गेले.

विष्णुपुरी (गु.र.नं. ११५२/२६): २ लोखंडी बोटी व ४ ब्रास रेती, २२ तराफे व ४४ ब्रास रेती आणि काठावर साठवलेली १० ब्रास रेती – एकूण ३३.९० लाखांचा मुद्देमाल जप्त करून जागेवर नष्ट केला.



मार्कंड (गु.र.नं. ११५३/२६) १ फायबर बोट, ८ तराफे, १६ ब्रास रेती व २ इंजिन – एकूण १५.८० लाखांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. नागापूर (गु.र.नं. ११५४/२६) १ मोठी लोखंडी बोट, ३ तराफे व ६ ब्रास रेती –एकूण १६.८० लाखांचा मुद्देमाल नष्ट. या तिन्ही प्रकरणी ७ अज्ञात आरोपींवर BNS, महसूल व पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हे दाखल झाले.

दि. ९ सप्टेंबर रोजी पहाटे – वाजेगाव (गु.र.नं. ११५६/२६): मदिना हॉटेलजवळ हायवा टिप्पर (MH १७ CV ०२०९) मध्ये ५ ब्रास अवैध रेती वाहतूक करताना पकडला. चालक शुभम सावते याच्याकडून ४५.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त. कौठा (गु.र.नं.११५७/२६) रवी नगर कमान येथे छोटा टिप्पर (MH ३४ B ६१८९) मध्ये १ ब्रास रेती जप्त करण्यात आला.

## गुरुद्वारा मार्गावरील अतिक्रमणांवर महापालिका पथकाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा गेट नं. १ ते गुरुद्वारा श्री लंगरसाहेब रस्त्यावरील दोन्ही बाजूंच्या अतिक्रमणांवर धडक कारवाई केली.



आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशाने आणि पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात ही मोहीम राबवण्यात आली. या मुख्य रस्त्यावर दुकानदार, हातगाडीवाले आणि फेरीवाल्यांनी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत ओटे, टपऱ्या, शेड उभारल्याने रस्ता अरुंद झाला होता. त्यामुळे दररोज येणाऱ्या हजारो भाविकांना आणि वाहतुकीला अडथळा होत होता. उच्च न्यायालयातील जनहित याचिकेच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली.

बुधवारी सकाळी जेसीबी, डंपर आणि कर्मचाऱ्यांसह पथक घटनास्थळी दाखल झाले. अनधिकृत ओटे, शेड, जाहिरात फलक आणि हातगाडे भुईसपाट करण्यात आले. या कारवाईत एकूण १०२ अतिक्रमणधारकांवर कारवाई करून ४ ट्रक माल जप्त करण्यात आला.

ही कारवाई आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंह संधू यांच्या नेतृत्वात करण्यात आली. यावेळी सहायक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रीय अधिकारी राजेश जाधव, गौतम कवडे, नागनाथ पतंगे, विठ्ठल तिडके, अग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, पोउपनि उत्तम गुट्टे, अजय साखरे, वाहतूक शाखेचे रविंद्र घाडगे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

कारवाईमुळे गुरुद्वारा परिसरातील रस्ता पूर्णपणे मोकळा झाला असून भाविक व स्थानिक नागरिकांनी मनपाच्या कारवाईचे स्वागत केले आहे. यापुढे पुन्हा अतिक्रमण केल्यास गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे.



**नांदेड**– नांदेड दक्षिण आमदार चषक दहीहंडी महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी मराठी अभिनेत्री सुरभी हांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, दहीहंडीचे आयोजन शहरप्रमुख तुलजेश यादव, नगरसेविका सौ. नीलम यादव, युवा सेना जिल्हाप्रमुख विठ्ठल मोरे, दीपक स्वामी, सुधाकर टाक धानोरकर, दीपक बोधने, ब्रिजेश सोनी आदी उपस्थित होते. **(छाया : नरेंद गडप्पा)**

## गोकुंदा येथे बंजारा समाजाचा तीज महोत्सव उत्साहात

**किनवट (प्रतिनिधी)** –गोकुंदा येथील के. के. गार्डन मंगल कार्यालय येथे बंजारा समाजाच्यावतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी तीज महोत्सव व मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास बेबीताई प्रदीप नाईक, युवा नेते अर्चित नाईक, समाधान जाधव, राहुल नाईक, अनिल कहाळे, बंडू नाईक, धनलाल पवार यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रारंभी गोकुंदा येथील सद्गुरू श्री सेवालाल महाराज यांच्या मंदिरासमोर भोगपूजेने तीज महोत्सवाला सुरुवात झाली. उपस्थित मान्यवरांचा गोकुंदा येथील नायक प्रकाश गब्बा राठोड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तीज महोत्सव सोहळा या सणानिमित्त मान्यवरांची भाषणे



झाली. यावेळी युवा नेते अर्चित नाईक यांनी तीज महोत्सव सोहळा हा बंजारा समाजातील महिलेचा एकता, रूढी, परंपरा, बोलीभाषा, वेशभूषा यासह समाजाला एकसंघ करण्याचा हा मोठा सण असून, या सणाच्या माध्यमातून गेली नऊ दिवस एक आनंदाचे वातावरण प्रत्येक तांड्यावर पाहावयास मिळते. हा सण प्रत्येक तांड्यावर बंजारा समाजातील महिलांनी संघटित होऊन साजरा केला पाहिजे,असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

सूत्रसंचालन पत्रकार ईश्वर जाधव यांनी केले. आभार अर्चित नाईक यांनी मानले. यावेळी उपस्थित समाजबांधवांना स्व. प्रदीप नाईक प्रतिष्ठानच्यावतीने अन्नदान करण्यात आले. कार्यक्रमास महिलांसह ज्येष्ठ मंडळी, नवयुवक, बंजारा समाजातील कर्मचारी वर्ग व पुरुष मंडळी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## घरफोडीत दीड लाखांचा ऐवज लंपास, दुकानाचे शटर तोडून रोकड पळवली

**नांदेड (प्रतिनिधी)**–शहरात दोन ठिकाणी घरफोडी आणि दुकानफोडीच्या घटना घडल्या असून, चोरट्यांनी सुमारे दीड लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. याप्रकरणी शिवाजीनगर आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**शिवाजीनगरमध्ये घरफोडी**

दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंतच्या दरम्यान काब्दे हॉस्पिटलमागील परिसरात ही घटना घडली. फिर्यादी सुनिता सुभाष वाल्मीकी यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने आत प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख २४ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३९६/२०२६ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) BNS अन्वये गुन्हा दाखल असून, पोहेकॉ आकोसकर तपास करीत आहेत.

**नांदेड ग्रामीणमध्ये दुकानफोडी**

दुसरी घटना वसरणी रोडवरील शिंदे ट्रेडर्स येथे घडली. दि. ६ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० ते दि. ७ सप्टेंबर रोजी पहाटे ३.१५ च्या दरम्यान अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर टॉमीने उचकटून गल्ल्यातील २३ हजार ५०० रुपयांची रोकड चोरून नेली. फिर्यादी दीपक गोपाळ शिंदे (रा. भाग्यश्री सोसायटी) यांच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११४९/२०२६ कलम ३३१(४), ३०५ BNS अन्वये गुन्हा दाखल असून पोहेकॉ गुट्टे तपास करीत आहेत.

## नांदेड तहसीलच्यावतीने उद्या कुणबी प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तहसील कार्यालयाच्या सौजन्याने विष्णुपुरी व तुप्पा येथे कुणबी प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

विष्णुपुरी व तुप्पा मंडळ कार्यालयांतर्गत गावातील कुणबी प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी ११ सप्टेंबर रोजी विशेष शिबीर आयोजित केले आहे. संबंधित नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहुन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नांदेड तहसील कार्यालयाच्यावतीने शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २६ रोजी विष्णुपुरी व तुप्पा ग्रामपंचायत कार्यालय येथे विष्णुपुरी मंडळ व तुप्पा मंडळ अंतर्गत जवळपास २५ गावातील कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे. विष्णुपुरी मंडळ अंतर्गत श्रीकृष्ण येलमटे, ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे, ग्राममहसूल अधिकारी रमेश गिरी यांच्या उपस्थितीत गंगाबेट, भनगी, वाहेगाव, पिंपळगाव, मार्कंड, खुपसरवाडी, धनगरवाडी, कल्हाळ, विष्णुपुरी, पांगरी तर तुप्पा मंडळ अधिकारी एस. एस. अकसूलकर, तलाठी सज्जा योगीता अन्नमवार, गौतम पांढरे, अविनाश पवार, दिलीप पवार यांच्या उपस्थितीत तुप्पा, काकांडी, राहेगाव, भायेगाव, किक्की, गोपाळ चावडी, वडगाव, इंजेगाव, फतेपूर, बाभुळगाव येथील संबंधित गावातील नागरिकांना आवश्यक कागदपत्रे दाखल केल्यानंतर कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

## न्यायालयीन परिवारासाठी आरोग्यकवच; नांदेडमध्ये १०० हून अधिक आयुष्मान, वय वंदना कार्डचे वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा न्यायालय परिसरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड जिल्हा अधिवक्ता संघ आणि ‘टीम आयुष्मान’ यांच्या संयुक्त विद्यमाने न्यायाधीश, अधिवक्ता, न्यायालयीन कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आयुष्मान व वय वंदना कार्ड काढण्याचे विशेष शिबीर उत्साहात पार पडले. अभिवक्ता संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

शिबिराचे उद्घाटन नांदेडचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश एन. के. ब्रम्हे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न्यायाधीश, अधिवक्ता, न्यायालयीन कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिबिरादरम्यान १०० हून अधिक लाभार्थ्यांचे आयुष्मान व वय वंदना कार्ड यशस्वीरीत्या काढून देण्यात आले. काही तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित राहिलेली कार्डे संबंधित प्रक्रिया पूर्ण करून लवकरच लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात येणार असल्याची



माहिती आयोजकांनी दिली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ‘टीम आयुष्मान’चे सेवानिवृत्त अभियंता प्रकाश पत्तेवार, वामन गाजरे, श्रीमती पद्मजा आलूरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. आयोजकांच्या वतीने टीम आयुष्मान नांदेड् यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. या उपक्रमामुळे न्यायालयीन अधिकारी, अधिवक्ता आणि कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक योजनांचा लाभ सुलभपणे मिळण्यास मदत झाली असून, न्यायालयीन वर्तुळातून या सामाजिक उपक्रमाचे समाधान व्यक्त करण्यात आले.

## जैनबी शेख यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगाव



येथील रहिवासी जैनबी रज्जाकसाब शेख (७६) यांचे बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. त्यांचा पार्थिव बुधवारी सायंकाळी बाद-ए-मगरिब नमाजे जनाजानंतर खंडगाव मुस्लीम कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, जावई, सुना, पुतणे, पुतणी नातवंड असा परिवार आहे. खंडगाव येथील जामा-मस्जिदचे हाफिज शेख बालेसाब, माजी उपसरपंच दस्तगीर शेख यांच्या त्या आई होत.

## रामपूर पुलाजवळ सापळा; दोन दारू तस्कर जेरबंद, स्कुटीसह एक लाखाचा माल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधातील विशेष मोहिमेंतर्गत सिंदखेड पोलिसांनी अवैध देशी दारू वाहतुकीवर कारवाई करत १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सिंदखेडचे सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी चिंचखेडकडून रामपूरकडे स्कुटीवरून दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती ठाणे प्रभारींना मिळाली. त्यानुसार रामपूर येथील पैनगंगा नदीच्या पुलाजवळ सापळा रचण्यात आला. यावेळी (MH-२९-BT-३१३१) क्रमांकाच्या स्कुटीवर दोन्ही बाजूला पांढऱ्या पोत्यात देशी दारूची वाहतूक होत असल्याचे आढळले.

पंचासमक्ष तपासणी केली असता स्कुटीवर १००० देशी दारूच्या



बाटल्या (किंमत ४० हजार रुपये) आणि वाहतुकीसाठी वापरलेली स्कुटी (किंमत ६२ हजार रुपये) असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी करण प्रल्हाद बोटरे (वय २२) आणि दुर्गेश विजय दुतकर (वय २१, दोघे रा. नवीन कापेश्वर, जि. यवतमाळ) यांच्याविरुद्ध सिंदखेड पोलीस ठाण्यात गु.र.नं. १०९/२०२६ कलम ६५(B©), ८३ महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, उपविभागीय अधिकारी किरण भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संतोष जोधळे, अंमलदार कोंडापलकुलवार, इंगळे, चालक होमगार्ड राठोड यांनी केली.

## नांदेड पोलिसांकडून दोन सराईतांवर एमपीडीए, एका वर्षासाठी हर्सुल कारागृहात रवानगी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी कठोर पाऊल उचलले असून, दोन सराईत गुन्हेगारांना एमपीडीए कायद्यांतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. यंदाच्या वर्षातील ही १८ वी स्थानबद्धतेची कारवाई आहे.

पोलीस अधीक्षकांनी ‘टू प्लस’ योजनेअंतर्गत सराईत गुन्हेगारांची माहिती संकलित करून एमपीडीए प्रस्ताव सादर करण्याचे आदेश सर्व ठाणे प्रभारींना दिले होते. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. शेख जावेद उर्फ लड्या शेख रहेमत (वय २२, रा. विष्णुपुरी) याच्यावर दरोडा, अवैध अग्निशस्त्र बाळगणे व विक्री असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच अजय भगवान जोगदंड (वय २५, रा. राहुलनगर, सिडको) याच्यावर घातक शस्त्राने दुखापत, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, दरोडा व अवैध शस्त्र बाळगण्याचे गुन्हे आहेत.

वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नसल्याने लिंबगाव व नांदेड ग्रामीण पोलिसांनी स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता. स्थानिक गुन्हे शाखा व प्रतिबंधक सेलने कागदपत्रांची पूर्तता केली.

पोलीस अधीक्षकांच्या शिफारसीनुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी दोघांना एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. दोघांनाही ताब्यात घेऊन कारागृहात दाखल करण्यात आले आहे. यंदा आतापर्यंत १८ सराईतांवर एमपीडीए कारवाई झाली असून १५० हून अधिक गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई प्रस्तावित आहे.

## काँग्रेसचा उद्या जनआक्रोश मोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)**– माजी पंतप्रधान, भारतरत्न स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हक्काचे शहर या उपक्रमांतर्गत स्थानिक प्रश्नांवर दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्यासह उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या विशेष उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज चौक हडको ते सिडको या दरम्यान हडको, सिडकोवासियांचा जनआक्रोश मोर्चा शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष तथा आयोजक बापूसाहेब पाटील यांनी दिली आहे.

दरम्यान सिडको-हडको परिसरातील मूलभूत सुविधेच्या प्रश्नांसह हडको येथील साई मंगल कार्यालय अद्ययावत करून पुन्हा मंगल कार्यालय म्हणूनच सुरू करावे, सिडको आरोग्य केंद्रात नियमित सेवा व औषधी उपलब्ध करावी आदींसह अन्य नागरी समस्या सोडविण्याची मागणी करण्यात येणार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com